# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग






# वार्षिक अहवाल

## २०१९-२०











# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

## वार्षिक अहवाल

## २०१९ - २०

## कार्यालय

तिसरा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत,

सर पोचखानवाला रोड, वरळी,

मुंबई, महाराष्ट्र.

**मा. मंत्री,**
**महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन**



**मा. श्रीम. पंकजा मुंडे,**
(०१.०४.२०१९ ते २४.१०.२०१९)

**मा. राज्यमंत्री,**
**महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन**



**मा. श्रीम. विद्या ठाकूर,**
(०१.०४.२०१९ ते २४.१०.२०१९)

**मा. मंत्री,**
**महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन**



**मा. श्रीम. ॲड. यशोमती चंद्रकांत ठाकूर (सोनावणे)**
(३०.१२.२०१९ ते अद्यापपर्यंत)

**मा. राज्यमंत्री,**
**महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन**



**मा. श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबुराव कडू**
(३०.१२.२०१९ ते अद्यापपर्यंत)

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची रचना

**आयोगामध्ये अध्यक्ष आणि सहा सदस्य आणि एक सचिव यांचा समावेश आहे.**

**आयोगामध्ये १२ कर्मचारी होते.**

## आयोगाचे अध्यक्ष



**मा.श्री. प्रवीण घुगे**

**अध्यक्ष**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

## आयोगाच्या सचिव



**श्रीम. सीमा व्यास** (भा. प्र. से.)

**सचिव,**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

# आयोगाचे सदस्य

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग



श्री. अशोक शिंदे
सदस्य



डॉ. शालिनी कराड
सदस्या



प्रो.अस्मा शेख (पटेल)
सदस्या



श्री. विजय जाधव
सदस्य



ॲड. स्वरदा केळकर
सदस्या



डॉ. वृषाली देशपांडे
सदस्या

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्ष | पान क्र. |
|---|---|---|
| i. | लघुनामे | १ |
| प्रकरण १ | प्रस्तावना | ३ |
| प्रकरण २ | आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विधिविधाने | ४ |
| प्रकरण ३ | आयोगाची संघटनात्मक संरचना | ६ |
| प्रकरण ४ | आयोगाचे कार्य व अधिकार | ७ |
| प्रकरण ५ | बालकांशी निगडीत प्रमुख कायदे | |
| | (अ) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ | ९ |
| | (ब) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ | ९ |
| | (क) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षक कायदा (पोक्सो) २०१२ | ११ |
| | (ड) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षक कायदा सुधारणा (पोक्सो) २०१९ - टिपणी | १४ |
| प्रकरण ६ | आयोगाचे मा. अध्यक्ष व सदस्य यांनी केलेले उपक्रम व कार्ये | |
| | (अ) कार्यशाळा | १७ |
| | (ब) आयोगाचे उपक्रम | १७ |
| | (क) आयोगा मार्फत घेण्यात आलेले जनजागृती कार्यक्रम | १९ |
| | (ड) आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या भेटी | २६ |
| प्रकरण ७ | शिक्षण क्षेत्रातील आयोगाचे विशेष योगदान | ३२ |
| प्रकरण ८ | आयोगाने महत्त्वाचे प्रकरणांबाबत केलेल्या काही शिफारशींचा सारांश | ३६ |
| प्रकरण ९ | नमुना “अ” तक्रारींचा तपशील | ४३ |
| प्रकरण १० | ऑडिटरचा अहवाल व ताळेबंद अहवाल | ४४ |

## ➢ टिप - लघुनामे

| | |
|---|---|
| ए डी जी पी | अतिरिक्त पोलीस महासंचालक (Additional Director General of Police) |
| सी सी आय | बालकांची देखबाल करणाऱ्या संस्था (Childcare Institution) |
| सी सी एस ई | बालकांच्या लैंगिक शोषणाचा सामना करणे (Countering Child Sexual Exploitation) |
| सी डब्ल्यू सी | बालक कल्याण समिती (Child Welfare Committee) |
| सी डब्ल्यू पी ओ | बालक कल्याण पोलीस अधिकारी (Child Welfare Police Officer) |
| डी सी पी यु | जिल्हा बालक संरक्षण पथक (District Child Protection Unit) |
| डी ओ | जिल्हा अधिकारी (District Officer) |
| डी डब्ल्यू सी डी | महिला व बाल कल्याण विभाग (Department of Women and Child Development) |
| आय ए एस | भारतीय प्रशासकीय सेवा (Indian Administration Services) |
| आय सी एम ई सी | बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी आंतरराष्ट्रीय केंद्र (International Centre for Missing and Exploited Children) |
| आय जी | महानिरीक्षक (Inspector General) |
| आय जे एम | आंतरराष्ट्रीय न्याय अभियान (International Justice Mission) |
| आय पी एस | भारतीय पोलीस सेवा (Indian Police Service) |
| जे जे ॲक्ट | बाल न्याय अधिनियम २०१५ (Juvenile Justice Act, 2015) |
| जे जे बी | बाल न्याय मंडळ (Juvenile Justice Board) |
| एम ओ यु | सामंजस्य करार (Memorandum of Understanding) |
| एम एस सी पी सी आर | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (Maharashtra State Commission for Protection of Child Rights) |
| एन सी एम ई सी | बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी राष्ट्रीय केंद्र (National Centre for Missing and Exploited Children) |
| एन सी पी सी आर | राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग (National Commission for Protection of Child Rights) |
| एन सी आर बी | राष्ट्रीय गुन्हे अभिलेख कार्यालय (National Crime Records Bureau) |
| पी पी पी | सार्वजनिक – खासगी भागीदारी ( Public Private Partnership ) |
| पी डब्ल्यू सी | प्राईसवाटर हाउस कुपर्स ( Pricewater house Coopers ) |
| एस सी | सर्वोच्च न्यायालय ( Supreme Court ) |
| एस आय आर | सामाजिक तपास अहवाल ( Social Investigation Report ) |
| एस जे पी यु | पोलीस विशेष बालक पथक ( Special Juvenile Police Unit ) |
| एस पी | पोलीस अधीक्षक ( Superintendent of Police ) |

## अध्यक्षांच्या लेखणीतून

**"बालो हि नाम राष्ट्रस्य अतुलो ऽ यं निधिर्महान् ।**

**वात्सल्येन महत्प्रेम्णा गोपनीयश्च सर्वदा ।।"**

कोणत्याही राष्ट्राचा अतुलनीय आणि महान ठेवा म्हणजे त्या राष्ट्राची बालके असतात. हा ठेवा वात्सल्याने आणि मोठया प्रेमाने नेहमीच संरक्षिला गेला पाहिजे. तरच राष्ट्राचे उज्ज्वल भविष्य व उन्नती साध्य करता येऊ शकते. यासाठी मुलांना अनुकूल वातावरण निर्माण करून देणे, प्रतिकुलतेतून त्यांची सुटका करणे, अन्यायापासून संरक्षण करणे आणि प्रत्येक बालकाला फुलण्यासाठी पोषक वातावरण देण्याची अत्यंत आवश्यकता असते.

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक व्यक्तीला जे समान हक्क बहाल केलेले आहेत, त्यात जगण्याचा अधिकार, संरक्षणाचा अधिकार, विकासाचा आणि सहभागाचा अधिकार यांचा समावेश होतो. यासाठी बालकांसाठीच केवळ जे कायदे अस्तित्वात आलेले आहेत, त्या सर्व कायद्यांचे पर्यवेक्षण करीता संपूर्ण महाराष्ट्रातील बालकांना सुरक्षेचे कवच देण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग राज्य शासनाच्या २४ जुलै, २००७ च्या आदेशानुसार स्थापित करण्यात आलेला आहे.

आयोग बाल हक्क संरक्षणासाठी कटिबद्ध असून बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५, बाल न्याय अधिनियम २०१५, लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ या सर्वांची सर्व स्तरावर सुयोग्य अंमलबजावणी होण्यासाठी संबंधित पोलीस यंत्रणा, बाल कल्याण समित्या, महिला व बालविकास आयुक्तालय, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, सामाजिक न्याय विभाग यांसारख्या विविध विभागांमध्ये समन्वय साधत बालकांना सर्वतोपरी सहाय्य करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे.

यासाठी आयोगाकडे प्राप्त तक्रारींच्या सुनावण्या घेऊन बालकांना न्याय देण्यासाठी आयोग सदैव तत्पर आहे. एवढेच नाही तर बालक व त्याचे सर्वांगिण हित हे केंद्रस्थानी मानून विविध प्रकारच्या कार्यशाळा, बैठका, प्रबोधनात्मक कार्यक्रमही आयोगाच्या पुढाकाराने संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात आले. प्राप्त तक्रारींबाबत नियमितपणे सुनावण्या घेऊन बालकांना दिलासा देण्याचे कार्य अखंडितपणे सुरु आहे. मुलांशी संबंधित नोंद झालेल्या गुन्ह्यांबाबत आयोगाने संबंधित पोलीस यंत्रणेशी सातत्याने समन्वय ठेवत व पाठपुरावा करत ते लवकर निकाली लागतील यासाठी जाणीवपूर्वक प्रयास केलेले आहेत. संबंधित यंत्रणांना अधिक सजग, सक्षम व बालकांसाठी उदार दृष्टिकोण निर्माण करण्यासाठी प्रबोधनात्मक कार्यशाळांचे आयोजन आवर्जून करण्यात आले.

यासाठी आयोगाचे अध्यक्ष व सर्व सदस्य, सचिव, कार्यालयीन अधिकारी/ कर्मचारी अविरतपणे प्रयत्नशील राहिलेले आहेत. वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांना भेट देणे, बाल संस्थांना भेटी देऊन योग्य त्या सूचना देणे. शासन आणि संस्था यांचे मध्ये बाल हिताच्या दृष्टीने समन्वय प्रस्थापित करणे. निरनिराळ्या कार्यालयीन भेटी, बैठका, सुनावण्या, तपासण्या या सर्व माध्यमांतून बालकांचे हित जोपासण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने सातत्याने पुढाकार नोंदविलेला आहे. बाल विवाहासारख्या अथवा लैंगिक अत्याचारासारखी एखादी घटना त्वरित थांबवलेली आहे. तर अन्य अत्याचाराच्या घटनांना बालकांना न्याय देण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न केलेला आहे. जुलै, २००७ मध्ये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आल्यानंतर आयोगाने बालकांच्या हिताच्या नभांगणात गरुड भरारी घेतल्याचे दिसून येते. याबरोबरच बालकांना सुरक्षेचे, प्रगतीचे पंख देण्यासाठी आयोग सातत्याने प्रयत्नशील आहे, म्हणूनच महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग ही भावना बालक, पालक, समाजातील लोकांमध्ये सजगता वाढत आहे, यातच आयोगाचे खरे यश सामावलेले आहे असे वाटते.

अत्यंत कमी कालावधीत बालकांसाठी सजग जागरूक राहिलेल्या महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग भविष्यात बालकांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी तत्पर अग्रेसर राहील याबाबत मला पूर्ण विश्वास आहे. आपण सर्व मिळून बालकांसाठी त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध राहणे या आशेसह लेखणीस विराम देतो.

**मा.श्री. प्रवीण घुगे,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग.

## प्रकरण १. प्रस्तावना

बालके ही, कोणत्याही राष्ट्राची अत्यंत मौल्यवान संपत्ती असते आणि अनुकूल व सहाय्यभूत वातावरण उपलब्ध करून दिले तर, प्रत्येक बालक हे, प्रगल्भ, प्रौढ व्यक्तीमध्ये विकसित होईल आणि देशाचा जबाबदार नागरिक होईल. अशा प्रकारे, समाजाच्या सर्वंकष विकासासाठी योग्य बालविकास अत्यंत महत्त्वपूर्ण आहे आणि राष्ट्रीय मानव संसाधन विकासासाठी बालकांची योग्य काळजी घेणे हा, उत्तम मार्ग आहे. भारत हा सर्वाधिक बाल लोकसंख्या असलेला देश आहे.

भारताच्या संविधानाने, लिंग, वय, जात आणि आर्थिक दर्जा विचारात न घेता, बालकांसह आपल्या सर्व नागरिकांना समान हक्क बहाल केलेले आहेत. बालकांच्या हक्कांचे, प्रामुख्याने त्यांच्या जीवनातील सर्व बाबींचा समावेश करून पुढील चार प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जातेः जीविताचा हक्क, संरक्षणाचा हक्क, विकासाचा हक्क व सहभाग घेण्याचा हक्क हे हक्क अंमलात आणण्यासाठी आपल्या घटनात्मक तरतुदींच्या धर्तीवर अनेक महत्वाचे कायदे अधिनियमित करण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाच्या कायद्यांमध्ये, बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) अधिनियम, २०१२ आणि बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांचा समावेश असून त्यात इतर गोष्टींबरोबरच आपल्या देशातील बालकांसाठी अनुकूल व संरक्षणात्मक वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम,२००५ अंमलात आल्याने, बालकांच्या हक्कांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचे संरक्षण करण्यासाठी शासनाद्वारे उपायोजनांची अंमलबजावणी करण्यामधील एक नवीन टप्पा सुरू झाला आहे. सर्व कायदे, धोरणे, कार्यक्रम व प्रशासकीय यंत्रणा या, भारताच्या संविधाना मध्ये आणि तसेच संयुक्त राष्ट्र संघाच्या बालकांच्या हक्कांबाबतच्या अभिसंधीमध्ये (UNCRC) संविनिर्दिष्ट केलेल्या यथार्थ दर्शी बाल हक्कांशी सुसंगत आहेत याची सुनिश्चिती करण्यासाठी यामध्ये राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य बाल हक्क संरक्षण आयोग गठीत करण्याची तरतूद केलेली आहे.

राष्ट्रीय स्तरावर २००७ मध्ये, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना केल्यापासून आत्तापर्यंत राज्यांमध्ये ३४ बाल हक्क संरक्षण आयोग स्थापित असून संबंधित विविध कायद्यांमध्ये अनिवार्य केल्याप्रमाणे, बाल हक्कांचे उल्लंघन केल्याबाबत चौकशी करण्यासाठी आणि बाल हक्कांचे संरक्षण व प्रचलन करण्यासाठी अन्य उपक्रम हाती घेण्याकरिता त्यांची स्थापना करण्यात आलेली आहे.

# प्रकरण – २ आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विधीविधाने

**<u>बाल हक्कांचे संरक्षण करणारे करार :</u>**

मुलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठया संख्येने अधिवेशने, संधी, कायदे आणि सनद लागू करण्यात आले आहेत. संबंधित कायदेशीर चौकटीची रुपरेषा खालील नमूद केल्याप्रमाणे आहे.

**१. <u>आंतरराष्ट्रीय विधानः- बालकांच्या हक्कांवर संयुक्त राष्ट्रांचे अधिवेशन (UNCRC)</u>**

१९८९ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने अंगीकृत केलेली बाल हक्क विषयक अभिसंधी (सीआरसी) हा, भारतासह बहुसंख्य विकसित तसेच विकसनशील देशांनी अनुसमर्थन केलेला सर्व स्वीकृत असा संयुक्त राष्ट्रांचा करार आहे. या अभिसंधीमध्ये, बालकांच्या सर्वोत्तम हिताचे संरक्षण करताना, सर्व राज्य पक्षकारांनी अनुसरण करावयाची मानके विहित केलेली आहेत आणि बालकांचे मूलभूत हक्क अधोरेखित केलेले आहेत. या अभिसंधीचे अनुसमर्थन करणाऱ्या देशांनी, तिच्या तरतुदीं, कायदेशीररित्या बंधनकारक असल्याचे मान्य केले आहे. या अभिसंधीच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी त्यांनी हाती घ्यावयाच्या उपाययोजनां बाबत ते बाल हक्कविषयक तज्ज्ञांना नियमितपणे अहवाल देतात.

संयुक्त राष्ट्रांच्या बाल हक्क विषयक अभिसंधी (युएनसीआरसी) नुसार, बालकांचे हक्क हे वंश,रंग, लिंग, भाषा, धर्म, मूळ, संपत्ती, जन्म विषयक दर्जा किंवा क्षमता विचारात न घेता,१८ वर्षांखालील सर्व व्यक्तींना द्यावयाचे किमान हक्क व स्वातंत्र्य आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या बाल हक्क विषयक अभिसंधी (युएनसीआरसी) मध्ये ५४ अनुछेद असून त्या प्रत्येकामध्ये विविध प्रकारचे हक्क अंतर्गत आहेत जसे कीः

- जीविताचा हक्क
- विकासात्मक हक्क
- संरक्षणाचा हक्क
- सहभागी होण्याचा हक्क

**सभा करार कलम १६ मध्ये असे नमूद केले आहे की :-**

i) कोणतेही बालक, त्याची / तिची गोपनीयता, कुटुंब, किंवा पत्रव्यवहार यांमध्ये अनियंत्रित किंवा बेकायदेशीरपणे हस्तक्षेप करण्यास, किंवा त्याची किंवा तिची प्रतिष्ठा व सन्मान यांवर बेकायदेशीरपणे हमला करण्यास अधीन असणार नाही.

ii) अशा हस्तक्षेपा विरुद्ध किंवा हमल्या विरुद्ध कायद्याचे संरक्षण मिळण्याचा बालकाला हक्क आहे. सभा करार कलम ४० मध्ये असे नमूद केले आहे की, दंडात्मक कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप असलेल्या बालकाची गोपनीयता, कार्यवाहीच्या सर्व टप्प्यावर संरक्षित करण्यात यावी.

सन २००५ मध्ये, केंद्र शासनाने, सशस्त्र संघर्षातील बालकांचा सहभाग आणि बालकांची विक्री, बाल वेशाव्यवसाय व बाल अश्लीलता यांचे निवारण करणाऱ्या बालकांच्या हक्कांवरील संयुक्त राष्ट्रांचे अधिवेशनाच्या दोन वैकल्पिक प्रोटोकॉलचा अंगीकार केला आहे. हिंसाचाराच्या व पिळवणुकीच्या या धोकादायक प्रकारांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी भारताने आपल्या राष्ट्रीय धोरणास बळकटी दिली आहे आणि उपाययोजना केल्या आहेत.

## २. राष्ट्रीय विधान :- भारताचे संविधान

भारताच्या संविधानाने बालकांच्या दुर्बलतेस आणि त्यांच्या संरक्षणाच्या हक्कांस मान्यता दिली आहे. संरक्षणात्मक भेदभावाचे तत्व अनुसरून, बालकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक व विशेष कायदे व धोरणे याद्वारे बालकांकडे विशेष लक्ष देण्यासाठी अनुच्छेद १५ मध्ये हमी दिली आहे.

समानतेचा हक्क, जीवनाचे संरक्षण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य आणि शोषणविरोधी हक्क ह्या सगळ्या बाबी घटनेचे कलम १४, १५, १५(३), १९(१)(ए) ,२१, २१(ए), २३, २४, ३९(इ), ३९(फ),व ४५ हयात अधोरेखित आहेत. तसेच हे कलम बालकांसह, सर्व लोकांचे संरक्षण, सुरक्षा आणि त्यांचे कल्याण करण्याचे प्रतिबद्धतेचे पुनरुच्चार करतात. संबंधित अनुच्छेदातील तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

**अनुच्छेद १४ :** राज्य, कोणत्याही व्यक्तीस, भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही.

**अनुच्छेद १५ :** राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही.

**अनुच्छेद १५(३):** या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, महिला व बालके यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

**अनुच्छेद १९(१)(ए) :** सर्व नागरिकांस, भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा हक्क असेल.

**अनुच्छेद २१ :** कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.

**अनुच्छेद २१ (ए) :** ६ ते १४ वर्षे वयाच्या सर्व बालकांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण.

**अनुच्छेद २३ :** माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई; माणसांचा सर्व अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार दंडनीय अपराध असेल.

**अनुच्छेद २४:** कारखाने, इत्यादींमध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई: १४ वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोकादायक कामावर लावले जाणार नाही.

**अनुच्छेद ३९ :** **राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विवक्षित तत्वे.**

(इ) स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरण्यास भाग पाडू नये.

(फ) बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्वक वातावरणात आपला विकास करण्याची संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांना शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे.

**अनुच्छेद ४५ :** सर्व बालकांसाठी त्यांच्या वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांसाठी तरतूद करण्याकरिता राज्य प्रयत्नशील राहील.

## प्रकरण -३ आयोगाची संघटनात्मक रचना

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. श्री. प्रवीण घुगे | अध्यक्ष |
| २ | श्री. संतोष शिंदे | सदस्य |
| ३ | डॉ. शालिनी कराड | सदस्या |
| ४ | प्रा. श्रीमती अस्मा शेख | सदस्या |
| ५ | श्री. विजय जाधव | सदस्य |
| ६ | ॲड. स्वरदा केळकर | सदस्या |
| ७ | डॉ. वृषाली देशपांडे | सदस्या |

## आयोगाच्या कार्यालयातील प्रशासकीय संरचना

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सचिव | १ | १ | ० |
| २ | विधी सल्लागार | १ | १ | ० |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | १ | १ | ० |
| ४ | सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी | १ | १ | ० |
| ५ | उच्च श्रेणी लघुलेखक | २ | १ | १ |
| ६ | परिवीक्षा अधिकारी | २ | २ | ० |
| ७ | लिपिक | २ | २ | ० |
| ८ | शिपाई | २ | २ | ० |

## प्रकरण – ४ आयोगाची कार्ये व अधिकार

**अ) बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाची कार्ये खालील प्रमाणे आहेत :**

**१. आयोग खालीलपैकी सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडेल, जसे की,**

| | | |
|---|---|---|
| i | बाल हक्कांच्या संरक्षणासाठी कोणत्याही कायदयाव्दारे किंवा त्या अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या संरक्षणाची तपासणी करणे आणि आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायांची शिफारस करणे; | |
| ii | आयोगास योग्य वाटेल तसे वार्षिक आणि अशा नियतकालिक राज्य शासनास, त्या खबरदारीचे उपाय म्हणून कामाचा अहवाल सादर करणे; | |
| iii | बालकांच्या अधिकारांचे उल्लंघन केल्याबद्दल चौकशी करणे आणि अशा प्रकरणांमध्ये कार्यवाहीची शिफारस करणे; | |
| iv | दहशतवाद, जातीय हिंसाचार, दंगली, नैसर्गिक आपत्ती, घरगुती हिंसाचार,एचआयव्ही, एड्स/तस्करी, दुर्व्यवहार, छळ व शोषण, अश्लील साहित्य आणि वेश्याव्यवसाय यांनी बाधित झालेल्या बालकांना त्यांच्या हक्कांचा फायदा घेण्यास प्रतिबंध करणाऱ्या सर्व बाबींचे परीक्षण करणे आणि योग्य उपाययोजनांची शिफारस करणे; | |
| v | विशेष काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांशी संबंधित समस्यांकडे लक्ष देणे, ज्यात त्रस्त बालक, उपेक्षित आणि वंचित बालक, विधीसंघर्षग्रस्त बालके, अल्पवयीन बालक, कुटुंब नसलेली बालके आणि कैदयांची बालके यांचा समावेश आहे व तसेच योग्य उपाययोजनांची शिफारस करणे; | |
| vi | करार आणि इतर आंतरराष्ट्रीय साधनांचा अभ्यास करणे आणि विदयमान धोरण, कार्यक्रमांचे नियोजन आणि बालकांच्या हक्कांवरील इतर उपक्रमांचा नियमित आढावा घेणे आणि बालकांच्या सर्वोत्तम हितासाठी त्या उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारसी करणे; | |
| vii | बाल हक्कांच्या क्षेत्रात संशोधन हाती घेणे आणि संशोधनासाठी प्रोत्साहन देणे; | |
| viii | समाजातील विविध घटकांमध्ये बाल हक्कांबाबत साक्षरता पसरवणे आणि प्रकाशने, माध्यमे, चर्चासत्र आणि इतर उपलब्ध माध्यमांव्दारे या अधिकारांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षणाविषयी जागरूकता वाढविणे; | |
| ix | राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सुधारगृह किंवा बालकांसाठी असणाऱ्या निवासस्थान किंवा संस्थांची तपासणी करणे, कोणत्याही सामाजिक संस्थेव्दारे चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही संस्थेसह इतर कोणतेही प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील, कोणतेही बाल संरक्षक निवारागृह किंवा ठिकाण, बालकांना सुधारण्यासाठी किंवा संरक्षणाच्या उद्देशाने ताब्यात घेण्यात येते किंवा दाखल केले जाते आणि आवश्यक वाटल्यास त्यावर योग्य ती कार्यवाहीसाठी या अधिकाऱ्यांकडे नेणे. | |
| x | तक्रारींची चौकशी करणे आणि खाली नमूद केलेल्या बाबींसंबंधित स्वयंप्रेरणेने सूचना देणेः | |
| | (i) बालकांच्या अधिकारांची उल्लंघन आणि वंचित ठेवणे | |
| | (ii) बालकांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी प्रदान केलेल्या कायदयाची अंमलबजावणी न करणे. | |
| | (iii) बालकांचे त्रास कमी करण्याच्या आणि कल्याण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे किंवा सूचनांचे पालन न करणे, तसेच अशा बालकांना आराम प्रदान करणे किंवा अशा प्रकरणांमध्ये उद्‌भवणारे मुद्दे योग्य अधिकाऱ्यांकडे उपस्थित करणे. | |
| xi | बालकाच्या हक्कांच्या वाढीसाठी अशी इतर आवश्यक कार्ये आणि उपरोक्त कार्यांमध्ये अनुषंगिक कोणतीही बाब. | |

**२) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या नियमा नुसार ७ चा नियम, २०१०**

| | |
|---|---|
| १ | बाल हक्क कराराचे अनुपालन करण्यात येते किंवा नाही याचे निर्धारण करण्यासाठी विद्यमान कायदा, धोरण आणि कार्यप्रणालीचे विश्लेषण करणे, बालकांवर परिणाम करणाऱ्या धोरणाच्या अथवा कार्यप्रणालीच्या कोणत्याही पैलुची चौकशी करून अहवाल देणे आणि बाल हक्कांच्या दृष्टिकोनातून प्रस्तावित नवीन विधीविधानावर अभिप्राय देणे. |
| २ | त्या संरक्षक उपाययोजनांच्या कामावरील अहवाल शासन, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग आणि राज्याच्या इतर आयोगांकडे दरवर्षी व राज्य आयोगाला योग्य वाटेल अशा इतर कालांतराने सादर करणे; |

| | |
|---|---|
| ३ | बालकांनी स्वतःहून केलेल्या किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही संबंधित व्यक्तीने केलेल्या अथवा बाल हक्कांचे उल्लंघन झाल्याची कोणतीही बाब जेव्हा आयोगाच्या निदर्शनास येईल तेव्हा आयोगाने स्वाधिकारे दाखल केलेल्या कोणत्याही तक्रारीवर विशेष चौकशी हाती घेणे; |
| ४ | बालकांचे प्राधान्यक्रम आणि कल्पनांचे प्रतिबिंब दिसून यावे म्हणून पालकांचा दृष्टिकोन आयोगाला थेट कळविण्यात आल्याची आयोगाच्या कामकाजावरून खात्री करून घेणे; |
| ५ | आयोगाने तसेच बालकांची संबंधित काम करणाऱ्या शासकीय विभागांनी आणि संघटनांनी आपल्या कामकाजातून बालकांच्या विचारांचा प्रसार करणे, त्यांना योग्य तो न्याय देणे आणि त्याची गंभीर दखल घेणे; |
| ६ | बाल हक्क विषयक माहिती तयार करणे आणि तिचा प्रसार करणे; |
| ७ | शालेय पाठ्यक्रमात शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये बाल हक्काचा समावेश करण्यास प्रोत्साहन देणे आणि बालकांशी निगडित काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देणे. |

## प्रकरण – ५ बालकांशी निगडीत इतर कायदे

### अ ) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ :-

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या कलम ३१ आणि ३२ अंतर्गत राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाला पुढील कार्ये सोपविण्यात आली आहेत.**

| | |
|---|---|
| i) | या अधिनियमाव्दारे किंवा त्या अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या संरक्षणाची तपासणी करणे व त्यांचा आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजनांची शिफारस करणे. |
| ii) | बालकांच्या मोफत व अनिवार्य शिक्षणासंबंधी तक्रारींची चौकशी करणे आणि |
| iii) | बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियमाची कलम १५ व २४ या अन्वये तरतूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करणे. |
| iv) | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कासंबंधित कोणत्याही बाबींची चौकशी करताना बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम कलम १४ व २४ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा समान अधिकार असेल. |
| v) | कलम ३१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमा खालील कोणत्याही व्यक्तीला एखाद्या बालकांच्या अधिकाराशी संबंधित कोणतीही तक्रार करायची असल्यास तिला त्या कार्यक्षेत्रात असलेल्या स्थानिक प्राधिकरणात लेखी तक्रार करता येईल. |
| vi) | पोटकलम ३२(१) अंतर्गत तक्रार प्राप्त झाल्यानंतर स्थानिक प्राधिकरण संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत या बाबीवर निर्णय देईल. |
| vii) | स्थानिक प्राधिकरणाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे किंवा यथास्थिती कलम ३२ पोट कलम ३ अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडे अपिल करता येईल |

### ब ) १. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधनियिम, २०१५

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ हा एक सर्वसमावेशक कायदा असून त्याव्दारे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० निरसित केलेला आहे. या अधिनियमांमध्ये, विकासाच्या गरजा पुरवून, आणि बालकांच्या सर्वोत्तम हितार्थ, प्रकरणांचा निर्णय घेण्यामध्ये व ती निकालात काढण्यामध्ये बाल-स्नेही दृष्टिकोन स्वीकारून त्याव्दारे काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके आणि विधी संघर्षग्रस्त बालके (CICL) अशा दोन्हीं साठी, आणि या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या विविध संस्थांमार्फत त्यांचे संपूर्ण पुनर्वसन करण्यासाठी तरतूद केलेली आहे.

जे गुन्हे, आत्तापर्यंत अन्य कोणत्याही कायद्याखाली समाविष्ट केलेले नव्हते, असे बालकांविरुद्ध केले जाणारे अनेक नवीन गुन्हे, या अधिनियमांमध्ये समाविष्ट केलेले आहेत. यामध्ये, अवैध दत्तक ग्रहणासह कोणत्याही प्रयोजनासाठी बालकांची विक्री व खरेदी करणे, बाल देखभाल संस्थांमधील शारीरिक शिक्षा, दहशतवादी गटांव्दारे बालकांचा वापर, अपंग बालकांविरुद्धचे गुन्हे आणि बालकांचे अपहरण या गुन्ह्यांचा समावेश होतो.

या अधिनियमात, बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समिती यांचे अधिकार, कार्य व जबाबदाऱ्या यांमध्ये सुस्पष्ट तरतूद केली आहे. बाल गुन्हेगारांनी केलेल्या अत्यंत गंभीर गुन्ह्यांची प्रकरणे, त्यांची प्रौढ म्हणून न्याय चौकशी करावी किंवा कसे हे निर्धारित करण्यासाठी प्राथमिक मूल्यमापन केल्यानंतर, बाल न्यायालयाकडे (सत्र न्यायालयाकडे) हस्तांतरित करण्याचा पर्याय, बाल न्याय मंडळास दिला आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याबरोबरच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० च्या कलम २१ खाली देखील महत्वाची तरतूद अंतर्भूत असून त्या अन्वये या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये सहभागी विधीसंघर्ष ग्रस्त बालके किंवा काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके यांची नावे, इत्यादी प्रसिद्ध करण्यास मनाई केलेली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाच्या कलम १०९ नुसार, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाकडे व राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे या अधिनियमाच्या तरतुदींचे सनियंत्रण व अंमलबजावणी करण्याची कामे सोपविलेली आहेत. ही कामे, उक्त अधिनियमाखालील कामांशिवाय सोपवलेली आहेत.

## २. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ खालील प्राधिकरणे

| बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाखालील विविध स्तरावरील प्राधिकरणे / अभिकरणे / संस्था/ कार्याधिकारी | | |
|---|---|---|
| **तपशील** | **ज्या स्तरावर तिची रचना केली आहे तो स्तर** | **त्यांच्या स्थापनेसाठी जबाबदार असलेले प्राधिकरण** |
| **मंडळे** | | |
| केंद्रीय सल्लागार मंडळ | राष्ट्रीय | केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालय |
| राज्य सल्लागार मंडळ | राज्य | निवड समितीमार्फत राज्य शासन |
| जिल्हा / शहर सल्लागार मंडळ | जिल्हा | राज्य शासन |
| बाल न्याय मंडळ | जिल्हा | निवड समितीने केलेल्या शिफारशीवरून राज्य शासन |
| **समित्या** | | |
| निवड समिती | राज्य | राज्य शासन |
| निरीक्षण समिती केवळ बालगृहासाठी | राज्य | राज्य शासन |
| निरीक्षण समिती केवळ बालगृहासाठी | जिल्हा | निवड समितीने केलेल्या शिफारशीवरून राज्य शासन |
| बाल कल्याण समिती | जिल्हा | निवड समितीने केलेल्या शिफारशीवरून राज्य शासन |
| बाल समिती | प्रत्येक संस्थेमध्ये | संस्थेचा प्रभारी अधिकारी |
| व्यवस्थापन समिती | प्रत्येक संस्थेमध्ये | जिल्हा बाल संरक्षण युनिट किंवा जेथे जिल्हा बाल संरक्षण युनिट नसेल तेथे जिल्हा दंडाधिकारी / जिल्हाधिकारी |
| **प्राधिकरणे / युनिटे / संघटना / अभिकरणे (एजन्सी)** | | |
| राज्यस्तरीय सहाय्य सेवा प्राधिकरण | राज्य | राज्य शासन |
| राज्य बाल संरक्षण युनिट (एससीपीयु) | राज्य | राज्य शासन |
| जिल्हा बाल संरक्षण युनिट (डीसीपीयु) | जिल्हा | राज्य शासन |
| विशेष बाल पोलीस युनिट (एसजेपीयु) | जिल्हा | राज्य शासन |
| **गृहे / संस्थात्मक देखभाल सुविधा** | | |
| बालगृहे (सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| निवारागृहे (सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| विशेषीकृत दत्तक अभिकरणे (सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| सेवा संस्था काळजी पश्चात संघटना (सीसीएल+ सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| निरीक्षण गृहे (सीसीएल) | जिल्हा | राज्य शासन |
| विशेष गृहे (सीसीएल) | जिल्हा | राज्य शासन |
| सुरक्षिततेचे ठिकाण (सीसीएल) | जिल्हा | राज्य शासन |

| कार्याधिकारी | | |
|---|---|---|
| मुख्य न्यायदंडाधिकारी | जिल्हा | त्या राज्याचे उच्च न्यायालय |
| परिविक्षा अधिकारी | जिल्हा | राज्य शासन |
| कल्याण अधिकारी | जिल्हा | राज्य शासन |
| बाल कल्याण अधिकारी | प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये | पोलीस उपायुक्त/ पोलीस अधिक्षक |
| एस जे पी यु  मधील दोन सामाजिक कार्यकर्ते | जिल्हा | राज्य शासन |

*** टीप: राज्य शासन याचा अर्थ, बाल संरक्षणाशी संबंधित असणारा राज्य शासनाचा संबंधित विभाग, असा आहे. काही राज्यांमध्ये, तो महिला व बाल विकास विभाग असतो तर, अन्य काही राज्यांमध्ये, तो समाज कल्याण / सामाजिक न्याय विभाग असतो.**

बाल न्याय अधिनियमान्वये, काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या (सीएनसीपी) संबंधात सक्षम प्राधिकरण म्हणून बाल कल्याण समितीची, आणि कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या (सीसीएल) प्रकरणे निकालात काढण्यासाठी अंतिम प्राधिकरण म्हणून बाल न्याय मंडळाची स्थापना केली आहे.

### ३. केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (CARA):

केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (सीएआरए) ही, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याच्या कलम ६८ अन्वये गठित केलेली भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाची एक वैधानिक संस्था आहे. ती, भारतीय बालकांच्या विकासासाठी नोडल संस्था म्हणून काम करते आणि देशांतर्गत व आंतर-देशीय दत्तक प्रक्रीयेतील संनियंत्रण व विनियमन करणे अनिवार्य करते. केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (सीएआरए) ची, केंद्र शासनाने २००३ मध्ये पुनरुज्जीवीत केलेल्या हेग अधिवेशनातील आंतर-देशीय दत्तक अभिसंधी, १९९३ च्या तरतुदीनुसार आंतर-देशीय दत्तक संबंधी कार्यवाही करण्यासाठी केंद्रीय प्राधिकरण म्हणून रचना केलेली आहे. केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (**CARA**), प्रामुख्याने तिच्या सहयोगी / मान्यता प्राप्त दत्तक अभिकरणांमार्फत (एजन्सी), अनाथ, तिरस्कृत / परित्याग केलेल्या व सोडून दिलेल्या बालकांच्या दत्तक संबंधी कार्यवाही करते.

### क) १. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हा, लैंगिक दुर्वर्तन व पिळवणूक यापासून बालकांचे संरक्षण करण्याच्या कायदेशीर तरतुदी बळकट करतो. प्रथमच बालकांविरुद्धच्या लैंगिक गुन्ह्यांच्या समस्येचे निवारण करण्यासाठी एक विशेष कायदा संमत करण्यात आलेला आहे. बालकांच्या लैंगिक शोषणा संबंधी गुन्हे हे, भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. भारतीय दंड संहितेमध्ये, बालकांविरुद्धच्या सर्व प्रकारच्या लैंगिक शोषणाविरुद्ध तरतूद नाही आणि त्यामध्ये प्रौढ व बाल पीडित व्यक्ती यांच्यामध्ये वर्गीकरण केलेले नाही.

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ मध्ये, बालकाची, १८ वर्षे वया खालील कोणतीही व्यक्ती अशी व्याख्या केलेली आहे आणि बालकांचे लैंगिक छळवणूक, छेडछाड, अश्लीलता, कुकर्म, अत्याचार, बलात्कार, ह्या गुन्ह्यांपासून १८ वर्षे वयाखालील सर्व बालकांचे संरक्षण व्हावे, ह्या उद्देशाने हा विशेष कायदा अस्तित्वात आला आहे.

या अधिनियमामध्ये बालकांविरुद्धचे पाच लैंगिक गुन्हे निश्चित केले आहे - लैंगिक बलात्कार, भेदक लैंगिक शोषण, तीव्र लैंगिक शोषण, लैंगिक अत्याचार, लहान मुलांचा अश्लीलतेसाठी वापर करून घेणे होय. ह्या गुन्ह्यांचे अवप्रेरण अथवा प्रयत्न करणे ही देखील दंडनीय बाब मानली जाते. या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी विशेष न्यायालय म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये सत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी या अधिनियमान्वये राज्य सरकारांना अनिवार्य केले आहे. तथापि, जर एखाद्या जिल्ह्यामध्ये, बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ या खालील बाल न्यायालय किंवा तस्तम प्रयोजनासाठी विशेष न्यायालय अधिसूचित करण्यात आलेले असेल तर, ते न्यायालय या अधिनियमाखालील अपराधांची न्याय चौकशी करेल.

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ च्या कलम ४४ आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण नियम, २०१२ चा नियम ६ अन्वये, राष्ट्रीय व राज्य बाल हक्क संरक्षण आयोगांना आणखी पुढील अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेतः-

अ) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ च्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे;

ब) राज्य सरकारांनी विशेष न्यायालय स्थापन केल्याचे सनियंत्रण करणे;

क) राज्य सरकारांनी सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती केल्याचे सनियंत्रण करणे;

ड) बालकांना सहाय्य करण्यासाठी न्यायचौकशी-पूर्व व न्याय चौकशीच्या टप्प्यावर संलग्न असलेल्या अशासकीय संस्था, व्यावसायिक व तज्ञ किंवा मानसशास्त्र, सामाजिक कार्य, शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य व बाल विकास यांमधील ज्ञान असणाऱ्या व्यक्ती यांचा वापर करण्यासाठी राज्य शासनाद्वारे या अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे तयार करण्याचे सनियंत्रण करणे आणि ही मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याचे सनियंत्रण करणे;

इ) या अधिनियमाखालील आपली कामे प्रभावीपणे पार पाडण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांसह पोलीस कर्मचाऱ्यांना व अन्य संबंधित व्यक्तींना स्वतंत्र प्रशिक्षण नियामक तयार करण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्याचे सनियंत्रण करणे;

फ) या अधिनियमाच्या तरतुदींची, सर्वसामान्य जनता, बालके तसेच त्यांचे माता-पिता व पालक यांच्यामध्ये जाणीव, जागृती व्हावी यादृष्टीने, या अधिनियमाशी संबंधित असणाऱ्या तरतुदींची माहिती, दूरदर्शन, रेडिओ व मुद्रित माध्यम यांसह सर्व माध्यमांमार्फत प्रसारित करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन यांचे सनियंत्रण करणे व त्यांना सहाय्य करणे;

ग) बाल कल्याण समितीच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या बालकाच्या लैंगिक शोषणाच्या कोणत्याही विशिष्ट प्रकरणाबाबत अहवाल मागविणे;

ह) पुढील माहितीसह, लैंगिक दुरुपयोगाची कळविलेली प्रकरणे व या अधिनियमांच्या तरतूदींप्रमाणे प्रस्थापित केलेल्या प्रक्रियेनुसार बालकांच्या लैंगिक शोषणाबाबत नोंदवल्या गेलेल्या प्रकरणांची व त्यांच्या निकालाबाबतची माहिती (Data) आयोग स्वतः अथवा संबंधित प्रतिनिधींमार्फत मागवून त्यामध्ये निम्नलिखित मुद्द्यांचा समावेश असेलः-

i. या अधिनियमान्वये नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या व तपशील;

ii. या अधिनियमान्वये व नियमान्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीचे संबंधित कालमर्यादित, पालन केले होते किंवा कसे;

iii.आकस्मिक वैद्यकीय शुश्रूषा व वैद्यकीय तपासणी यांची व्यवस्था करण्यासह, या अधिनियमाखालील गुन्ह्यांच्या बळी पडलेल्या व्यक्तींची शुश्रूषा व संरक्षण व्यवस्थांचा तपशील; कोणत्याही विशिष्ट प्रकरणी, संबंधित बाल कल्याण समितीने, एखाद्या बालकांची काळजी व

iv. संरक्षण करण्याच्या गरजेचे मूल्यांकन करण्यासंबंधीचा तपशील.

क्ष) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करणे आणि आपल्या वार्षिक अहवालातील एक स्वतंत्र प्रकरणांमध्ये सदर विषयावर अहवाल संसदेला सादर करणे.

**२. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ याखालील प्रमुख प्राधिकरणे –**

| | |
|---|---|
| **पोलीस/ विशेष बाल पोलीस युनिट** | • माहिती नोंदवणे<br>• प्राथमिक मूल्यांकन<br>• २४ तासांच्या आत प्रकरणची नोंद करणे<br>• आवश्यक असल्यास, २४ तासांच्या आत बाल कल्याण समिती समोर सादर करणे<br>• बालकाच्या वैद्यकीय गरजेकडे लक्ष देणे<br>• माता-पित्यांना / पालकांना माहिती देणे |

| | |
|---|---|
| **बाल कल्याण समिती** | • आवश्यक असल्यास, बालकास बालगृहात वगैरे दाखल करणे<br>• सहायक व्यक्ती उपलब्ध करून देणे |
| **जिल्हा बाल संरक्षण युनिट** | • नोंदवही ठेवणे व ती अधिकारी यांना उपलब्ध करून देणे<br>• दुभाषिकांच्या/ अनुवादकाच्या सेवेसाठी रक्कम प्रदान करणे |
| **न्याय दंडाधिकारी** | • जबाब नोंदवणे |
| **विशेष न्यायालय/ न्यायाधीश** | • इन कॅमेरा न्याय चौकशी करणे<br>• बालस्नेही वातावरण सुनिश्चित करणे<br>• बालकाचा स्वाभिमान जपणे<br>• बालकाची गोपनीयता राखणे (नाव उघड न करणे)<br>• बालकाचा साक्षपुरावा ३० दिवसांच्या आत नोंदविणे<br>• १ वर्षाच्या आत न्यायचौकशी पूर्ण करणे |
| **विशेष सरकारी अभियोक्ता** | • प्रकरणांचा अभियोग, केवळ या अधिनियमाखाली चालविणे |
| **सहाय्यभूत व्यक्ती** | • गोपनीयता राखणे<br>• माता-पित्यांना / पालकांना माहिती देणे<br>• न्यायिक प्रक्रियेतील त्याची/ तिची भूमिका बालकाला समजावून सांगणे |
| **केंद्र शासन** | • अधिनियमास प्रसिद्धी देणे<br>• अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे<br>• नियम व मार्गदर्शक सूचना तयार करणे<br>• या अधिनियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना ज्या अडचणी उद्‌भवतील त्या अडचणी दूर करण्यासाठी या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांच्या आत, म्हणजेच १३ नोव्हेंबर,२०१४ च्या आत आदेश पारित करणे |
| **राज्य शासन** | • विशेष न्यायालय म्हणून एखाद्या न्यायालयास पदनिर्देशित करणे<br>• विशेष सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करणे<br>• अधिनियमास प्रसिद्धी देणे<br>• अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे<br>• नियम व मार्गदर्शक सूचना तयार करणे |
| **राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य बाल हक्क संरक्षण आयोग** | • अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे<br>• विशिष्ट प्रकरणांबाबत बाल कल्याण समितीकडून अहवाल मागवणे<br>• आपल्या वार्षिक अहवालातील स्वतंत्र प्रकरणाद्वारे अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत अहवाल सादर करणे |

**ड. लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायदा सुधारणा (पोक्सो)२०१९ यावर टिपण –**

लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ यामध्ये २०१९ साली सुधारणा करून त्यामधील अपराधांसाठी अधिक कडक शिक्षा केली गेली आहे. त्यामध्ये बालकांवर लैंगिक अपराध केल्यास मृत्यूदंडाच्या शिक्षेचा ही समावेश आहे. याचा उद्देश बालकांविरुद्ध असे अपराध होणे थांबवणे व अपराध्यांना कठोर शासन व्हावे असा आहे. २०१९ च्या सुधारणा कायद्यामध्ये संभोग चित्रिकरणाकरिता/ संभोग वर्णन करिता बालकांचा वापर (चाईल्ड पोर्नोग्राफी) याला प्रतिबंध घालण्यासाठी दंड व तुरुंगवास अशा शिक्षेची तरतूद आहे.

सदर २०१९ चे सुधारणा विधेयक दि.१८ जुलै, २०१९ रोजी राज्यसभेत सादर झाले व त्याला राज्यसभेत दि.२४ जुलै, २०१९ मध्ये मंजूरी दिली. लोकसभेने त्याला दि.०१.०८.२०१९ रोजी मंजूरी दिली. सदर सुधारणा भारताच्या राजसत्रात दि.६ ऑगस्ट, २०१९ रोजी अधिसूचित केली गेली व दि. १६ ऑगस्ट, २०१९ रोजी अंमलात आली.

**या लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षणा (सुधारणा) कायदा, २०१९ च्या महत्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे –**

**➢ अंतर्भेदी लैंगिक हल्ला –**

पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ४ मधील प्रावधानामध्ये अंतर्भेदी लैंगिक हल्ला झाल्यास शिक्षेबाबत तरतूद आहे. २०१९ च्या सुधारणेनुसार याबाबतचा तुरुंगवास ७ वर्षांपासून वाढवून १० वर्षे केला आहे. सदर शिक्षा जन्मठेप व दंड अशीही वाढू शकते.

तसेच पुढे असेही दिले आहे की, जर पीडीत व्यक्तींचे वय १६ वर्षांखाली असेल तर सदर शिक्षा किमान २० वर्षे तुरुंगवास ते जन्मठेप अशी होऊ शकते व दंड ही केला जाऊ शकतो. सदर दंड हा पीडीत व्यक्तीच्या वैद्यकीय खर्चासाठी व पुनर्वसनासाठी वापरला जाऊ शकतो.

**➢ विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ला –**

पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ४ मध्ये काही कृतींना विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ला असे म्हटले आहे. यामध्ये जेव्हा एखादा पोलीस अधिकारी, सशस्त्र दलाचा सदस्य किंवा सार्वजनिक सेवक किंवा अन्य लहान मुलावर अंतर्भेदी लैंगिक हल्ला करतो त्याबाबतीत तरतुदी दिल्या आहेत. त्याचप्रमाणे जेव्हा हल्ला करणारी व्यक्ती सदर बालकाचे नातेवाईक असतील किंवा सदर लैंगिक हल्ल्यामध्ये बालकाच्या लैंगिक अवयवांना इजा पोचते किंवा बालक गर्भवती होते त्या बाबतही तरतूद केली आहे. या सुधारणा नुसार या व्याख्येमध्ये अधिक गोष्टी जोडल्या गेल्या आहेत.

१) अशा लैंगिक हल्ल्यामध्ये बालकाचा मृत्यू होणे.

२) नैसर्गिक संकटे व हिंसेच्या वातावरणात केलेला लैंगिक हल्ला.

या २०१९ च्या दुरुस्तीनुसार अशा विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ल्याबद्दलची शिक्षा सध्याच्या “१० वर्षे ते जन्मठेप व दंड” या शिक्षेपासून “२० वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या काळासाठी सश्रम कारावास की जो जन्मठेपेमध्ये रुपांतरित होऊ शकतो आणि दंड किंवा मृत्यूदंड (पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ६ नुसार). सदर दंड हा पीडीत व्यक्तींचे वय १६ वर्षांखाली असेल तर सदर शिक्षा किमान २० वर्षे तुरुंगवास ते जन्मठेप अशी होऊ शकते व दंड ही केला जाऊ शकतो. सदर दंड हा पीडीत व्यक्तीच्या वैद्यकीय खर्चासाठी व पुनर्वसनासाठी वापरला जाऊ शकतो.

**➢ लैंगिक हल्ला –**

पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ७ नुसार जर एखाद्या व्यक्तीने लैंगिक हेतूने एखाद्या मुलाच्या / मुलीच्या योनीला / लिंगाला, गुदद्वाराला किंवा स्तनांना स्पर्श करणे (की ज्यात प्रवेशन होत नाही) पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ९ मध्ये विकोपकारी लैंगिक हल्ला याची व्याख्या दिली आहे. त्यामध्ये जेव्हा एखादा पोलीस अधिकारी, सशस्त्र दलाचा सदस्य किंवा सार्वजनिक सेवक किंवा अन्य एखादा बालकावर लैंगिक हल्ला करतो / करते त्याबाबतच्या तरतुदी दिल्या आहेत. त्यामध्ये २०१९ च्या सुधारणेनुसार दोन आणखी बाबी जोडल्या गेल्या आहेत. १) जातीय किंवा वांशिक तरतुदी दंगलीच्या वेळी किंवा कोणत्याही नैसर्गिक संकटाच्या वेळी लैंगिक हल्ला केला जातो. २) एखाद्या बालकाला लैंगिक परिपक्वता लवकर यावी यासाठी त्याला / तिला कोणतेही संप्रेरक (हार्मोन) किंवा अन्य रसायन देणे किंवा त्यासाठी मदत करणे.

**➢ संभोगवर्णन / संभोग दर्शनाच्या हेतूसाठी –**

सुधारणा कायदा, २०१९ मध्ये बाल संभोग दर्शन / संभोग वर्णन यांची व्याख्या अशी दिली आहे. त्यानुसार बाल संभोग दर्शन / बाल संभोग वर्णन म्हणजे अशा कोणत्याही लैंगिक वर्तणुकीचे स्पष्ट दृश्य पद्धतीने चित्रिकरण / रेखाटन की ज्यामध्ये एखाद्या बालकाचा सहभाग आहे. यामध्ये फोटोग्राफ, चित्रफीत (व्हीडीयो) डिजीटल किंवा संगणकाद्वारे निर्माण केलेली प्रतिमा की जी प्रत्यक्ष एखाद्या बालकापासून वेगळी दर्शविता येत नाही. तसेच एखादी तयार केलेली स्वीकृत केलेली किंवा बदललेली प्रतिमा जी एखाद्या बालकाचे रेखाटन/चित्रीकरण वाटते (पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम २ (डअ). २०१९ च्या सुधारणा कायद्यानुसार बालकांचा उपयोग संभोग दर्शन/संभोग वर्णनासाठी करणे हे आता शिक्षेला पात्र आहे. ही शिक्षा किमान १५ वर्षे तुरुंगवास व दंड अशी आहे. हाच गुन्हा पुन्हा केला तर ही शिक्षा ७ वर्षे तुरुंगवास व दंड अशी आहे. त्याचप्रमाणे २०१९ च्या सुधारणा कायद्यानुसार काही गुन्ह्यांसाठी तक्ता एक मध्ये दिल्याप्रमाणे शिक्षा वाढवली आहे.

**तक्ता १ – संभोग दर्शन / संभोग वर्णन यासाठी बालकाचा वापर करण्यासाठी शिक्षा –**

| गुन्हा | पोक्सो कायदा, २०१२ नुसार | पोक्सो सुधारणा कायद्यानुसार |
|---|---|---|
| बालकांचा संभोग दर्शनासाठी/ संभोग वर्णनासाठी वापर करणे | जास्तीत जास्त ५ वर्षे तुरुंगवास | कमीत कमी ५ वर्षे तुरुंगवास |
| बालकांचा अशा संभोग दर्शनासाठी/ संभोग वर्णनासाठी वापर की ज्याचा निकाल अंतर्भेदी लैंगिक हल्ल्या मध्ये होतो | किमान १० वर्षे, कमाल जन्मठेप | किमान १० वर्षे (जर संबंधित बालक १६ वर्षांपेक्षा कमी वयाचा असेल तर किमान २० वर्षे) |
| बालकांचा अशा संभोग दर्शनासाठ / संभोग वर्णनासाठी वापर की ज्याचा निकाल विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ल्यामध्ये होतो | जन्मठेप | किमान- २० वर्षे तुरुंगवास कमाल - जन्मठेप किंवा मृत्यूदंड |
| बालकांचा अशा संभोग दर्शनासाठी / संभोग वर्णनासाठी वापर की ज्याचा निकाल लैंगिक हल्ल्यामध्ये होतो | किमान - ६ वर्षे तुरुंगवास<br>कमाल - ८ वर्षे तुरुंगवास | किमान - ३ वर्षे तुरुंगवास<br>कमाल - ५ वर्षे तुरुंगवास |
| बालकांचा अशा संभोग दर्शनासाठी / संभोग वर्णनासाठी वापर की ज्याचा निकाल विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ल्यामध्ये होतो | किमान - ८ वर्षे तुरुंगवास<br>कमाल - १० वर्षे तुरुंगवास | किमान - ५ वर्षे तुरुंगवास<br>कमाल - ७ वर्षे तुरुंगवास |

**टीप – संभोग दर्शन / संभोग वर्णनासाठी बालकांचा वापर की ज्याचा निकाल कोणत्याही तऱ्हेच्या लैंगिक हल्ल्यामध्ये होतो यासाठीची शिक्षा ही संभोग दर्शन / संभोग वर्णनासाठी बालकांचा वापर करण्याची जी शिक्षा आहे त्यासाठीच्या किमान ५ वर्षे या शिक्षेमध्ये मिळवून भोगण्याची आहे.**

- ➢ पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम १५ च्या तरतुदीनुसार जी व्यक्ती कोणत्याही अशा प्रकारचे संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या बाबी / गोष्टी की ज्यामध्ये बालकांचा सहभाग आहे ते साठवतो किंवा त्याच्या / तिच्या अशा बाबी / गोष्टी आहेत परंतु अशी व्यक्ती त्या नष्ट करण्यात अपयशी ठरतो किंवा प्राधिकाऱ्यांना कळवण्यामध्ये अपयशी होतो व ज्या व्यक्तीचा हेतू सदर गोष्टी / बाबी शेअर करण्याचा आहे किंवा सदर बाबी प्रक्षेपित करण्याचा आहे अशा व्यक्तीला रु.५,०००/- पेक्षा कमी नाही इतका दंड भरावा लागेल व पुन्हा हाच गुन्हा त्याने केला तर त्याला दहा हजार रुपये दंड भरावा लागेल.
- ➢ सुधारणा कायदा, २०१९ नुसार जी व्यक्ती बालकांचा सहभाग असलेल्या संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या बाबी / गोष्टी साठवतो किंवा आपल्या ताब्यात ठेवतो किंवा कोणत्याही न्यायालयात अहवाल करण्याखेरीज किंवा पुरावा म्हणून सादर करणे या खेरीज कोणत्याही कारणासाठी त्याचे प्रक्षेपण करतो, वितरण करतो किंवा प्रसार करतो त्या व्यक्तीला कोणत्याही तऱ्हेचा ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही या शिक्षा होऊ शकतात.

- सुधारणा कायदा, २०१९ नुसार जी व्यक्ती वाणिज्यिक कारणासाठी बालकांचा सहभाग असलेल्या संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या बाबी / गोष्टी साठवतो किंवा आपल्या ताब्यात ठेवतो त्या व्यक्तीला कोणत्याही ३ वर्षे ते ५ वर्षे या मुदतीसाठी कोणत्याही तऱ्हेचा तुरुंगवास आणि दंड किंवा दोन्ही त्याचबरोबर सुधारणा कायदा, २०१९ मध्ये बालकांचा सहभाग असलेल्या संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या गोष्टींचा / वस्तूंचा साठा करण्याबाबतचे दोन गुन्हे समाविष्ट केले आहेत.

१ ) बालकांचा सहभाग असलेले संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या गोष्टी नष्ट करणे, गाळून टाकणे किंवा त्याचा अहवाल पाठवणे यामध्ये अपयशी होणे.

२ ) अशा तऱ्हेच्या गोष्टी / बाबी अहवाल पाठवण्याखेरीज अन्य तऱ्हेने ते वितरण करणे, त्याचे प्रदर्शन करणे, संप्रेषित करणे.

## प्रकरण – ६ आयोगाकडून घेण्यात आलेले विविध उपक्रमे व बैठका

### अ) कार्यशाळा :-

### १. बालस्नेही पंचायतींसाठी व्हीसीपीसी बळकट करण्याबाबत नाशिक विभाग कार्यशाळेचा संक्षिप्त अहवाल – दिनांक १६/१२/२०१९

नाशिक DWCD विभागीय कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष श्री. प्रवीण घुगे, सदस्य - श्री. संतोष शिंदे, श्रीमती. वासंती देशपांडे, सचिव श्रीमती. सीमा व्यास, भा.प्र. से. आणि अधिकारी, युनिसेफचे प्रतिनिधी, आरडीडीचे प्रतिनिधी, सुमारे १२० VCPC प्रतिनिधी आणि विभागातील CFP सदस्य. सदर कार्यशाळेमध्ये उपस्थित होते.

कार्यशाळेची सुरुवात सुश्री अनुराधा नायर, सामाजिक धोरण विशेषज्ञ, युनिसेफ यांच्या स्वागत भाषणाने झाली, ज्यांनी CFPs चे महत्त्व अधोरेखित केले आणि त्याला VCPCs च्या भूमिकेशी जोडले. नाशिक विभागाच्या विभागीय उपायुक्त श्रीमती पाटील यांनी विभागातील विविध उपक्रमांची माहिती देत अशा कार्यशाळांची गरज व्यक्त केली. डॉ. मंजुषा कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी राज्यातील बालहक्कांचे उल्लंघन दूर करण्यासाठी आयोगाची भूमिका मांडली, VCPC यांना आवश्यकता असेल तेव्हा त्यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले. श्री प्रवीण घुगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनीही मुलांच्या समस्या सोडवण्यासाठी व्हीसीपीसीचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. वासंती देशपांडे, सदस्य महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, यांनी आमचे कार्य बालकांमध्ये केंद्रित करून मुलांना आनंदी बालपण देण्याची भूमिका अधोरेखित केली. श्री. संतोष शिंदे, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी लहान मुलांचे दुर्लक्ष, शोषण, हानी आणि गैरवर्तन यापासून संरक्षण करण्यात प्रौढांची भूमिका आणि त्यांना संबोधित करण्यासाठी VCPCs ची भूमिका समोर आणून VCPCs चे संदर्भासह उदाहरण दिले. श्री. जगताप, संचालक, SIRD, यांनी GPDP मध्ये महिला आणि मुलांच्या समस्या सोडवण्याचे महत्त्व आणि हे करण्यात VCPCs ची भूमिका मांडली. युनिसेफच्या राज्य सल्लागार, सुश्री रजनी पवित्रण यांनी CFPs बद्दल मार्गदर्शन केले आणि नंदुरबारकडील CFP टीमने त्यांच्या गावांमध्ये CFP प्रक्रिया कशी राबविली जाते याबाबत व्यक्त केले. तदनंतर उपस्थितांसोबत, समोरील आव्हाने आणि त्यावर मात करण्याचे मार्ग यावर संवाद साधण्यात आला. त्यानंतर महिला व बाल विकास विभाग आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग सोबत पाठपुरावा करण्याच्या प्रक्रियेवर चर्चा करण्यात आली. विभागीय कार्यालयाकडून आभार मानून कार्यशाळेची सांगता झाली.

### ब) उपक्रम :-

### १. आमचा सहयोगी प्रकल्प 'The Invisibles' :-

**आमच्या सहयोगी प्रकल्प 'The Invisibles' चे मिड-टर्म रिव्ह्यू मीटिंगचे इतिवृत्त खाली नमूद केल्याप्रमाणेः-**

१. श्री.सीमा व्यास, भा.प्र.से.सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

२. श्रीम. मंजुषा कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

३. श्री. बाडगी, विधी सल्लागार, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

४. श्रीम. निवेदिता गोलतकर, उप संचालक, युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया R. O

५. श्री.लुका, MEAL सल्लागार, सेव्ह द चिल्ड्रन, नेदरलँड्स

६. श्री. सिद्धार्थ पांडे, महाव्यवस्थापक – प्रकल्प, नॅशनल सपोर्ट ऑफिस

७. श्री.अभिक दत्ता, सहाय्यक व्यवस्थापक, एम आणि ई, सेव्ह द चिल्ड्रन, नॅशनल सपोर्ट ऑफिस

८. श्रीम. रुपाली गोस्वामी, वकिली, संप्रेषण आणि मोहीम, महाराष्ट्र राज्य कार्यक्रम

**I) <u>सदर बैठकीत पुढील मुद्यांवर चर्चा करण्यात आली-</u>**

१. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग आणि Save the Children संयुक्तपणे ३ ठिकाणी (मुंबई, पुणे आणि नाशिक) येथे 'The Invisibles' हा प्रकल्प राबवत आहेत. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग कडे प्रकल्पाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्याचे अधिकार आहेत तर सेव्ह द चिल्ड्रेन सलामबालक ट्रस्ट (मुंबई), न्यू व्हिजन (पुणे) आणि नाशिक (सेव्ह द चिल्ड्रेनचा थेट हस्तक्षेप) यांच्या सहकार्याने त्याच्या तळागाळातील अंमलबजावणीसाठी जबाबदार आहे.

२. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने नेहमीच संबंधित शासकीय विभागास एकत्रित करण्यासाठी पाठिंबा दिला आहे आणि त्यांना एका सामायिक व्यासपीठावर आणले. सदर प्रकल्पासाठी पोलीस, आरोग्य, शिक्षण, पाणी आणि स्वच्छता, रेल्वे, राज्य बाल संरक्षण प्रणाली आणि यासारख्या विविध विभागांमध्ये अनेक एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता आहे.

३. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या भक्कम पाठिंब्याने, सेव्ह द चिल्ड्रन यांचेकडून मुंबई, पुणे आणि नाशिक येथे अनेक अभिसरण सभांचे आयोजन केले. तीनही ठिकाणी पोलीस विभागांसाठी संवेदनशीलता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

४. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या भक्कम पाठिंब्यामुळे, UIDAI विभाग देखील प्रकल्प हस्तक्षेपांना तितकाच पाठिंबा देत आहे. UIDAI विभागाकडून नेहमी आयोजित केलेल्या सर्व बैठकांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यात येतो. तसेच आधार शिबिरांचे आयोजन करणाऱ्या सेव्ह द चिल्ड्रनला पाठिंबा देण्यात येतो.

५. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने (Save's Course Correction Strategy) सेव्हच्या अभ्यासक्रम सुधारणा धोरणाचे (आधार कार्ड, पॅनकार्ड, जन्म प्रमाणपत्र, शाळेचे ओळखपत्र या प्रकल्पांतर्गत विचारात घेतले जाईल) कौतुक केले.

II) **<u>महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग कडून शिफारस आणि पुढील मार्ग</u>** :

- निकट/जवळून देखरेख करणारी यंत्रणा कार्यरत असणे आवश्यक आहे. आयोगाला मासिक अहवाल सादर करणे आवश्यक आहे. सेव्ह द चिल्ड्रन यांना ज्यात मुलांची ओळख प्राप्त झालेल्या बालकांची संख्या व सामाजिक सुरक्षा योजनांशी जोडलेले असलेबाबत मासिक प्रगती अहवाल सादर करण्यास सुचित केले
- प्रत्येक महिन्याच्या चौथ्या आठवड्यात किंवा पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात, सेव्ह द चिल्ड्रन आयोगाला अहवाल सादर करेल.
- सेव्ह द चिल्ड्रन यांनी आयोगाला तीनही ठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिरांची माहिती देण्यात यावी. आयोग शिबिराच्या साइटला भेट देतील.
- Save the Children ला सोशल मीडियावर (महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग वेबसाइट, ट्वीटर, फेसबुक आणि Save वेबसाईट) अशा सहयोगी प्रयत्नांची दृश्यता (Visibility) वाढवण्यासाठी सांगण्यात आले आहे.
- आयोगास एक यशस्वी गोष्ट (Success Story) सादर करण्यात यावी. ज्याची गोपनियता लक्षात घेऊन त्याचा प्रचार, प्रसार माध्यमांमध्ये प्रसारित करण्यात येईल.

III) **<u>सोशल मीडिया, कथेच्या गोपनीयतेचे पैलू लक्षात घेऊन UIDAI यांची शिफारस आणि मार्ग</u>** :

- मुंबई येथील प्रादेशिक कार्यालयात शिबिरे आयोजित करण्यासाठी Save the Children चे स्वागत करण्यात आले. रस्त्यावरील लहान मुलांसाठी प्रादेशिक कार्यालयात विशेष तरतूद करण्यात आली आहे.
- UIDAI विभाग तिन्ही ठिकाणी आधार नोंदणीशी संबंधित कोणतीही आव्हाने असल्यास सेव्ह द चिल्ड्रनला मदत करण्यास इच्छुक आहेत.

२. **महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महिला आणि बाल विकास मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य, क्रीडा, महिला व बाल विकास आणि बाल कल्याण समित्यांच्या देखरेखीसाठी बैठक आयोजित करण्यात आली.- दि.०४.०७.२०१९**

सदर सभेस आयोगाचे सदस्य श्री.विजय जाधव, प्रा.अस्मा शेख; श्री. हिवराळे, विभागीय आयुक्त, महिला व बाल विकास, श्रीमती. पाटील सहाय्यक आयुक्त, महिला व बालविकास, श्रीमती. कांबळे, जिल्हा अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. आवटी, तहसीलदार, पुणे व इतर अधिकारी उपस्थित होते.



**क) आयोगा मार्फत घेण्यात आलेले जनजागृती कार्यक्रम :-**

१. **महिला व बाल विकास विभाग व राज्य बाल हक्क संरक्षण आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे संयुक्त विद्यमानने आयोजित दत्तक जनजागृती व आढावा कार्यशाळा अहवाल :-**

**दि.२२.११.२०१९ रोजी माता कचेरी चिंतन सभागृह, दिक्षाभूमी चौक, नागपूर**

नागपूर विभागातील बाल कल्याण समिती, दत्तक संस्था, जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय व संबंधित संस्थाकरिता दत्तक जनजागृती व आढावा कार्यशाळा दि.२२.११.२०१९ रोजी मा. श्री. प्रविण घुगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच आयोगाच्या श्रीम. सीमा व्यास, सचिव, श्रीम. डॉ. वासंती देशपांडे, सदस्या, श्रीम. मनिषा बिरारीस कार्यक्रम व्यवस्थापक. महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था, पुणे तसेच श्री. एम.डी. बोरखेडे, विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास, विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास नागपूर विभाग, श्रीम. ए.जे.कोल्हे, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, नागपूर यांचे उपस्थितीत घेण्यात आली.

सदर कार्यशाळेस, नागपूर विभागातील बाल कल्याण समिती, अध्यक्ष व सदस्य, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्षातील अधिकारी / कर्मचारी तसेच शासकिय / अशासकीय बालगृहातील अधिक्षक / सामाजिक कार्यकर्ते, दत्तक संस्थेतील अधिक्षक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

सर्वप्रथम कार्यशाळेचे उद्घाटन मान्यवर प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर कार्यशाळेस उपस्थित मान्यवराचा परिचय व स्वागत करण्यात आले. तसेच कार्यशाळेची प्रस्तावना मा. एम.डी.बोरखेडे, विभागीय, उपायुक्त, महिला बाल विकास, नागपूर यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका व उद्देश स्पष्ट केला.

प्रथमतः श्री. मुस्ताक पठाण, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, नागपूर यांनी जिल्ह्यातील दत्तक संस्थांची सदयस्थिती व सांख्यिकीय माहिती पॉवर पॉईंटद्वारे सादर केली. यामध्ये बाल कल्याण समिती कडील एकूण प्रलंबित प्रकरणे तसेच मागील ३ वर्षापासून दत्तक गेलेली बालके, तसेच संस्थेत परत आलेली बालके याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली असून सदर परत आलेली बालके “कारा” या संकेतस्थळावर ”पाईप लाईन” मध्ये घेण्यात आलेली आहे किंवा नाही याबाबत माहिती देण्यात आली. तसेच प्रत्येक संस्थागत बालकांची कारा या संकेतस्थळावर नोंदणी होणे अनिवार्य असून बाल कल्याण समितीचे दाखल आदेश नमूना १८ मध्ये घेणे आवश्यक आहे. कोणत्याही बालकाला बिनाआदेशाने संस्थेत ठेवणे बेकायदेशीर आहे. तसेच जिल्ह्यामध्ये कोणत्याही बालकाचे बेकायदेशीररित्या दत्तक प्रकरण होऊ नये, त्याला प्रतिबंध लावण्यात यावा या करिता आपले स्तरावरून प्रत्येत संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पोलीस स्टेशन, रूग्णालय़, तसेच नोंदणीकृत पालक यांना अधिकृत दत्तक प्रक्रियेविषयी माहिती देऊन जनजागृती करण्यात यावी. जेणे करून बेकायदेशीर दत्तक होणाऱ्या प्रकरणांना वेळीच प्रतिबंध होऊ शकेल. बेकायदेशीर दत्तक प्रक्रिया आढळून आल्यास बाल न्याय अधिनियम, २०१५ अन्वये दंडास पात्र राहिल. याबाबत बाल हक्क आयोगाच्या सदस्या श्रीम.वासंती देशपांडे यांनी कायदेशीर दत्तक माहितीचे फलक / पोस्टर

व IEC साहित्ये प्रत्येक दवाखान्यात लावण्यात यावेत. वरदान संस्थेत सदर उपक्रम गेल्या अनेक वर्षापासून दत्तक सप्ताह राबविण्यात येतो, असे सांगितले.

संस्थेत बाळ दाखल झाल्यानंतर त्याचे वर्गीकरण करून ते बाळ बालक दत्तक मुक्त असल्यास त्याला दत्तक प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याची प्रक्रिया त्वरित करण्यात यावी बलंवि तया करण्यात येऊ नये तसेच भावंड बालकांच्या प्रकरणात दत्तक देताना दत्तक कायद्या नुसार त्यांना एकाच कुटुंबात द्यावे लागत असल्याने तसे कुटुंब विहित वेळेत, वयात उपलब्ध होत नसल्याने पर्यायाने त्यांचे वय वाढत जात असल्याने, त्यांना कुटुंबापासून वंचित राहत असल्याने, अशा कुमारी माता बाबत कुठल्याही परिसरातील तक्रारी संदर्भात पोलीसांकडे तक्रार आल्यास झिरो एफ.आय.आर. तात्काळ नोंदवण्यात यावे असे निर्देश देण्यात आले आहे.

दत्तक प्रकरणात अनेक समाजात नोटरी किंवा अवैध प्रकारे दत्तक प्रक्रिया केली जाते याबाबत बालकांना न्यायअधिनियम २०१५, तसेच केंद्रीय दत्तक प्राधिकरण नियमावली यांची विभागामार्फत जनजागृती व्यापक प्रमाणात व्हावी अशा सूचना आयोगाने दिल्या आहेत. बाल न्याय अधिनियम २०१५ अन्वये, बालगृहात राहत असलेल्या बालकांना वयोगटांनुसार वर्गीकरण करून वेगवेगळे ठेवण्याची तरतूद असल्याने त्यांना त्याप्रमाणे ठेवण्यात यावे. परंतु मुला मुलींना विशिष्ट वयोगटानंतर वेगवेगळ्या बालगृहात ठेवण्याची तरतूद आहे. तसेच खुले निवारागृहामध्ये बालकल्याण समितीच्या आदेशाने पाठवण्यात आलेल्या मुलांना जास्त कालावधी करता ठेवण्यात येते? याबाबत प्रश्न विचारला असता, त्या जिल्हा महिला बालविकास अधिकारी यांनी बाल कल्याण समिती सोबत बैठक घेऊन या विषयाचे निराकरण करण्यात यावे, असे सुचवण्यात आले की, ज्या पालकांना मुले दत्तक घ्यावयाची आहे, त्यांनी www.cara.nic.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी जेणे करून त्यानं ऑनलाइन प्रक्रिये द्वारे बालकाला कायदेशीर प्रक्रिये द्वारे दत्तक घेता येईल तसेच कुटुंबांतर्गत नातेसंबंधातील बालकांना दत्तक घ्यावयाचे झाल्यासत्यांनी सुद्धा दत्तक संकेत स्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. निर्वाह कायदा १९५६ अंतर्गत एका हिंदू कुटुंबाला, एका हिंदू कुटुंबातील बालकाला न्यायालयाद्वारे दत्तक घेण्याची मुभा देण्यात आली सर्व दत्तक संस्थांनी संस्थेत मागील दोन वर्षापासून मुले येत नाही याबाबत प्रश्न उपस्थित केला असता, यावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन जिल्ह्यातील शासकीय व खाजगी रुग्णालय व मॅटर्निटी होममध्ये संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन बैठकांचे आयोजन करण्यात यावे. सदर बाबीविषयी माहिती देण्यात यावी. दवाखान्यांमध्ये अल्पवयीन कुमारी गर्भवती माता, अत्याचार पीडित गर्भवती माता दाखल झाल्यास त्वरित याबाबतची माहिती संबंधित बाल कल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना कळविण्यात यावी. जेणेकरून मातेचे योग्य ते समुपदेशन करून त्यांचे बाळांचे कायदेशीररित्या परित्याग प्रक्रिया करून ते बाळ कायदेशीर दत्तक प्रक्रियेत आणता येईल. जेणेकरून संस्थेत बाळ येण्याच्या संख्येत वाढ होईल. याबाबत श्रीम. सीमा व्यास,भा.प्र.से. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी दत्तक प्रक्रियेबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांशी नियमित संवाद ठेवणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

संस्थेत बाळ दाखल झाल्यानंतर त्याचे वर्गीकरण करून ते बाळ बालक दत्तक मुक्त असल्यास त्याला दत्तक प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याची प्रक्रिया करण्यात यावी, तसेच यात भावंड किंवा बालकांच्या प्रकरणात त्यांना दत्तक देताना विलंब किंवा दुर्लक्षितपणा करण्यात येऊ नये. दत्तक कायद्यानुसार त्यांना एकाच कुटुंबात दत्तक देण्यात यावे. तसेच बालक विहीत वेळेत वयात उपलब्ध होत नसल्याने पर्यायाने त्यांचे वय वाढत असल्याने त्यांना कुटुंबापासून वंचित राहत असल्याने अशा कुमारी माता बाबत कुठल्याही परिसरातील तक्रारी संदर्भात पोलीसांकडे तक्रार असल्यास झिरो एफ. आय. आर. तात्काळ नोंदण्यात यावे असे निदेश देण्यात आले. दत्तक प्रकारात अनेक प्रकारे दत्तक नोटरी किंवा अवैध प्रकारे दत्तक प्रक्रिया केली जाते याबाबत समाजात बाल न्याय अधिनियम, २०१५ तसेच केंद्रीय दत्तक प्राधिकरण नियमावली यांची विभाग अंतर्गत जनजागृती व्यापक प्रमाणात व्हावी अशा सूचना आयोगाने दिल्या बाल न्याय अधिनियम २०१५ अन्वये बालगृहातील राहत असलेल्या बालकांना वयोगटा नुसार वर्गीकरण करून वेगळे ठेवण्याची तरतूद असल्याने त्यांना त्याप्रमाणे ठेवण्यात यावे परंतु मुला मुलींना विशिष्ट वयोगटा नंतर वेगळ्या बाल गृहात ठेवण्याची तरतूद आहे. तसेच खुले निवारागृहामध्ये बालकल्याण समितीचे आदेशाने पाठविण्यात आलेल्या मुलांना जास्तीत जास्त कालावधी करता ठेवण्यात येते? याबाबत प्रश्न विचारण्यात आला असता त्यामध्ये जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांनी बाल कल्याण समितीत सोबत बैठक घेऊन या विषयाचे निराकरण करण्यात यावे असे सुचविण्यात आले ज्या पालकांना मुली दत्तक घ्यावयाचे आहेत त्यांनी www.cara.nic.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी जेणेकरून कुटुंबांतर्गत त्यांना ऑनलाइन प्रक्रियेद्वारे कायदेशीररित्या बालदत्तक घेता येईल. नातेसंबंधातील बालकांना दत्तक घ्यायचे झाल्यास त्यांनी सुद्धा वरील संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. हिंदू दत्तक निर्वाह कायदा १९५६ अंतर्गत एका हिंदू कुटुंबाला एका हिंदू कुटुंबातील बालकास न्यायालयाद्वारे दत्तक घेण्याची मुभा देण्यात आली आहे. सर्व दत्तक संस्थांनी संस्थेत मागील दोन वर्षापासून मुले येत नाही याबाबत प्रश्न उपस्थित केला असता, यावर सविस्तरपणे चर्चा करण्यात येऊन जिल्हातील शासकीय रुग्णालय व मॅटर्निटी होम मध्ये संबंधित वैद्यकीय

अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष भेट घेऊन बैठकांचे आयोजन करण्यात यावे, दवाखान्यांमध्ये अल्पवयीन कुमारी गर्भवती माता, अत्याचार पीडित गर्भवती माता दाखल झाल्यास या बाबतची माहिती त्वरित संबंधित बाल कल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांना कळविण्यात यावी जेणे करून मातेचे योग्य ते समुपदेशन करून त्यांच्या बाळाचे कायदेशीरिता परित्याग प्रक्रिया करून ते बाळ कायदेशीर दत्तक प्रक्रियेत आणता येईल जेणेकरून संस्थेत बाळ येण्याच्या संख्येत वाढ होईल याबाबत श्रीमती सीमा व्यास भा प्र. से, सचिव महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी दत्तक प्रक्रिये बाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांशी नियमित संवाद ठेवणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. काही ठिकाणी दत्तक देणारे व घेणारी असे दोन कुटुंब एकत्र येऊन परस्पर दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये दत्तक विधान रजिस्टर करून घेऊन दत्तक प्रक्रिया कायदेशीर रित्या केल्याचे भासवितात. परंतु सदर प्रक्रिया केंद्रीय दत्तक प्रक्रियेनुसार बेकायदेशीर असल्याने याबाबत चर्चा झाली असता, यावर श्रीम. बिरारीस यांनी सदर दत्तक प्रक्रिया ही बेकायदेशीर असल्याचे सांगितले.

श्री. नितीन साठवणे, बाल संरक्षण अधिकारी, भंडारा यांनी गर्भवती महिलांची नोंदणी ही गाव स्तरावरील आंगणवाडी सेविका यांचेकडे होणे आवश्यक असल्याचे मत मांडले जेणे करून गावातील एकूण गर्भवती महिलांची संख्या निश्चितच करता येईल असे सुचविले या करिता ग्राम स्तरावरील स्थापित असलेल्या समितीला ग्राम बाल संरक्षण समितीकडून प्रशिक्षण देऊन सक्षम करण्याची गरज आहे.

श्री. अजय साखरकर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी चंद्रपूर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक खाजगी दवाखान्यात प्रत्यक्ष जाऊन कायदेशीर दत्तक विधान प्रक्रिये बाबत माहिती दिली असल्याने कुमारी अल्पवयीन अविवाहित मातांची माहिती जिल्हा बाल संरक्षण यांना तात्काळ कळविण्यात येत आहे असे सांगितले. याबाबत आयोगाच्या सचिव श्रीमती सीमा व्यास भाप्रसे यांनी या विषयावर डॉक्टरांशी सातत्याने बोलणे, संवाद ठेवणे आवश्यक असल्याचे महत्व विशद केले तसेच जनजागृती संदर्भात पोस्टर प्रत्येक दवाखान्यात लावल्यास ते जास्त प्रभावकारक ठरेल असे मत आयोगाच्या सदस्य माननीय देशपांडे मॅडम यांनी व्यक्त केले.

अल्पवयीन व कुमारी मातांच्या प्रकरणात त्यांचे पालक किंवा स्वतः मुलगी ही पोलीसात तक्रार द्यायला तयार होत नाही. परंतु संस्था स्तरावरून घडलेल्या घटनांची माहिती संबंधित पोलीसांना देण्यात येते याबाबत वर्धा बालकल्याण समिती सदस्य श्रीमती निता वंजलवार यांनी अशा प्रकारात सदस्य अथवा संस्था कर्मचारी जेव्हा तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला जातात तेव्हा त्यांना पोलीस स्टेशनला दिवसभर बसून ठेवले जाते, तक्रार घेतली जात नाही यावर प्राधान्याने कारवाई केली जात नसल्याची वस्तुस्थिती व्यक्त केली आहे.

जिल्हा महिला बाल विकास अधिकारी गडचिरोली श्री. भडांगे यांनी जी मुले वैद्यकीय उपचाराच्या कारणास्तव नागपूर बालकल्याण समितीकडे वर्ग केली जात केली आहेत, त्या मुलांबाबत बालकल्याण समिती नागपूर यांच्या कडून कार्यवाही केली जात नाही. याबाबत अशा प्रकारची मुले आहेत त्यांची माहिती देण्यात यावी जेणेकरून या मुलाबाबत योग्य तो निर्णय घेता येईल असे निर्देश दिलेत.

श्रीम. मनीषा मिरारीस, कार्यक्रम व्यवस्थापक यांनी फॉस्टर केअर ही योजना फक्त जे मुले दत्तक प्रक्रिये जाऊ शकत नाही त्याच मुलांना फास्टर केअर मध्ये जास्तीत जास्त तीन वर्ष कालावधी करिता फॉस्टर कुटुंबात देण्यात यावेत ती मुले फास्टर केअर कुटुंबांतर्गत पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी करता कुटुंबात असतील तर ते कुटुंब दत्तक मिळण्याकरिता विहित पद्धतीने अर्ज करू शकतात असे सांगितल्यावर आयोगाचे अध्यक्ष माननीय श्री प्रवीण घुगे यांनी जी मुले लीगली फ्री होऊ शकत नाही, त्याच मुलांचा फॉस्टर केअर मध्ये देण्याचा विचार करण्यात यावा तसेच फॉस्टर केअर कुटुंबाला प्रथमता फॉस्टर केरची संकल्पना ही कृष्णा व यशोदा मैया च्या भूमिकेसारखी असल्याचे समजावून सांगून त्या कुटुंबाचे समुपदेशन करण्यात यावे असे मत व्यक्त केले.

बाल न्याय अधिनियम २०१५ अन्वये कलम ४१ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या बालगृहात वयोगटानुसार मान्यता देण्यात आली नसून बालगृहाचा ६ ते १८ असा असून दाखल असलेल्या बालकांची त्यांच्या ६ ते १२ व १३ ते १८ अशा वयोगटानुसार त्याच बालगृहात स्वातंत्र्य निवास व्यवस्था करण्यात यावे, असे अभिप्रेत असल्याचे माहिती कार्यक्रम व्यवस्थापक श्री. मनीषा बिरारीस यांनी बैठकीत उपस्थितांना दिली.

श्री. डी. एम, बोरखेडे उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग यांनी विभागीय स्तरावर सर्व अधिकारी यांनी दत्तक संस्था यांची तीमाही बैठक आयोजित करून दत्तक प्रलंबित प्रकरणांबाबत आढावा घेण्यासंदर्भात तसेच दत्तक प्रक्रिया सुकर करण्याकरिता नियमित बैठक आयोजित करण्यात येईल असे आयोगासमोर सांगितले.

नॅशनल शिशुगृह कोंढाळी येथील सामाजिक कार्यकर्ता श्रीम.कामडी यांनी दत्तक गृहात बाल कल्याण समितीकडून दाखल आदेश दिले जात नसल्याची तक्रार बैठकीत केली असता, सदर तक्रारी बाबत वेगळी स्वतंत्र बैठक घेऊन चर्चा करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे मा. श्री. प्रवीण घुगे, अध्यक्ष, बाल हक्क संरक्षण आयोग यांनी निर्देश दिले.

सदर बैठकीस नागपूर विभागीय स्तरावरील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य, जिल्हा बाल संरक्षण कक्षातील अधिकारी व कर्मचारी तसेच दत्तक गृहातील अधीक्षक व सामाजिक कार्यकर्ता उपस्थित होते.

श्रीम. अर्पणा कोल्हे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नागपूर यांनी विभागीय स्तरावर उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी, दत्तक संस्था यांच्या आयोगातर्फे आभार मानले व सभा संपविण्यात आली.

### २. जनजागृती कार्यक्रम जिल्हा ठाणे प्राथमिक व माध्यमिक शिक्षक वर्ग

दि.८ जानेवारी, २०२० रोजी बाल हक्क सरंक्षण आयोग व समतोल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

उर्दु नॅशनल स्कुल, दुर्गाडी चौक, कल्याण येथे जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी रक्षा अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यशाळेस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सचिव, श्रीम. सीमा व्यास भा.प्र.से.,तसेच विधी सल्लागार, श्री.प्रमोद बाडगी, प्रशासकीय अधिकारी श्रीम. मंजुषा कुलकर्णी, समतोल मित्र व सकारात्मक विचार करायला लावणारे तज्ञ श्री. सुरेश लाड, उपशिक्षणाधिकारी श्री.निपुर्ते, कल्याण पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकारी श्रीम.अत्तरदे, श्रीम.सुवर्णा, समग्र शिक्षाचे कर्मचारी, समतोल कार्यकर्ते व समतोल संस्थेचे संस्थापक व सदस्य,बाल हक्क सरंक्षण आयोग महाराष्ट्र राज्य, श्री. विजय जाधव उपस्थित होते. एकुण ३०० शिक्षकांपैकी २४५ शिक्षक उपस्थित होते. सदर शिक्षकांना विद्यार्थी सुरक्षा मार्गदर्शक सुचनांबाबत शासन निर्णयाची प्रत व माहिती पुस्तिका देऊन सविस्तर माहिती देण्यात आली. सदर सत्राचे मार्गदर्शन श्री. विजय जाधव व डॉ. कालीदास शिंदे यांनी केले. तसेच उर्दू शाळेचे मुख्याध्यापक श्री. अब्दुल खान यांनी या कार्यक्रमाची व्यवस्था पाहिली.



कार्यक्रमात शिक्षकांना मनसोक्त संवाद साधता येऊन, सकारात्मक विचाराने विद्यार्थ्यांसमवेत संवाद कशा प्रकारे साधायचा याबाबत प्रशिक्षण मिळाले. तसेच याअनुषंगाने संबंधित परीपत्रक शिक्षकांना देण्यात येऊन माहिती देण्यात आली व याबाबतीत चर्चा झाली. यासंदर्भात अनेक शिक्षकांनी त्यांना येणाऱ्या अडीअडचणींबाबत चर्चा केली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. शाळेच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरा बसवलेले नाहीत.
२. तसेच समुपदेशक, सुरक्षा रक्षक, शाळेत नसल्यामुळे अघटीत घटना होउ शकते.
३. मुले आणि मुली यांचे प्रसाधनगृह जवळजवळ असल्यामुळे मुलेही मुलींना अपशब्द वापरतात.
४. मुलांच्या गैरहजेरीबाबत शाळेकडून पालकांना एसएमएस द्वारे कळवले जात नाही.

असे बरेच प्रश्न उपशिक्षणाधिकारी यांच्या समोर मांडण्यात आले.

जनजागृती कार्यक्रम सातत्याने वेगवेगळ्या ठिकाणी, शाळा, बालगृह, आश्रमशाळा, वसतीगृह,पोलीस यंत्रणा, हॉस्पीटल यंत्रणा, सोसायटी मध्ये, खाजगी क्लासेस, होस्टेल या ठिकाणी होणे आवश्यक आहे.

### ३. विद्यार्थी सुरक्षितता जन जागृती कार्यक्रम – पालघर दि.१७/०२/२०२०

ठिकाणः आनंद आश्रम इंग्लिश मीडियम स्कूल, पालघर

मा.श्री. विजय जाधव सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांनि सुचवल्यानुसार व मा.जिल्हाधिकारी, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाचे जिल्हा बाल संरक्षण कक्ष, पालघर, सखी वन

स्टॉप सेंटर व समतोल फाऊंडेशन, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद आश्रम इंग्लिश मीडियम स्कूल, पालघर येथे जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांचे केंद्र प्रमुख यांचेसाठी विद्यार्थी सुरक्षितता व बालकांच्या संरक्षणाबाबतचे कायदे, बालकांचे हक्क व अधिकार, बाल हक्क संहिता, शासन यंत्रणा यांची भूमिका या विषयांबाबत समतोल संस्था, ठाणे यांच्या माध्यमातून १ दिवसीय विद्यार्थी सुरक्षितता जनजागृती प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. सदर विद्यार्थी सुरक्षितता जनजागृती प्रशिक्षण कार्यक्रमात पालघर जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांचे १५० केंद्रप्रमुख उपस्थित होते.

**उपस्थित मान्यवर –**

१. मा. श्री. विजय जाधव- सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

२. डॉ. कालिदास शिंदे – समन्वयक, समतोल फाऊंडेशन, ठाणे

३. श्री. विनोद राठोड- जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, पालघर

४. श्री. दिपक सदावर्ते- महिला संरक्षण अधिकारी, पालघर

५. फादर प्रदीप डाबरे- आनंद आश्रम इंग्लिश मीडियम स्कूल,पालघर शाळेचे मुख्याध्यापक

६. सौ. मंदा डिमेलो – केंद्र प्रशासक (सखी वन स्टॉप सेंटर ,पालघर)

७. सौ. मोक्षदा मशाळकर- समुपदेशक (सखी वन स्टॉप सेंटर ,पालघर)

८. श्री. मिलिंद दोंदे – बाल संरक्षण अधिकारी (संस्था अंतर्गत), जिल्हा बाल संरक्षण कक्ष, पालघर

९. सौ. राजकन्या अडोळे- बाल संरक्षण अधिकारी (संस्था बाह्य), जिल्हा बाल संरक्षण कक्ष, पालघर

१०. श्री. खोतकर- शिक्षण अधिकारी ( माध्यमिक विभाग) जिल्हा पालघर

११. सर्व केंद्र प्रमुख- प्राथमिक शाळा,पालघर जिल्हा

**कार्यक्रमाचे प्रास्ताविक -**

श्री. खोतकर यांनी विद्यार्थी सुरक्षितता या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याबाबत भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थी सुरक्षा याबाबत सतर्क राहण्याचे आवाहन प्राथमिक शाळेचे केंद्र प्रमुख यांना केले.

प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व प्रशिक्षक मा. श्री. विजय जाधव, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी विद्यार्थी यांची सुरक्षा का महत्वाची आहे याबाबत उदाहरणासह मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी शाळेत दाखल झाल्यानंतर बालकांची शाळा व शाळेचा परिसर यामध्ये सुरक्षा किती महत्वाची आहे, याबाबत माहिती दिली. प्रत्येक शिक्षकाची सामाजिक जबाबदारी काय आहे, मुलांना सुरक्षित ठेवणे ही जबाबदारी फक्त शिक्षकाचीच नसून, टीआर त्यांच्या सोबत राहणारे व त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे हे पटवून दिले. अनाथ या शब्दाचा अर्थ सांगून अनाथ बालक म्हणजे ज्याला आपले म्हणणारे कोणी नाही, राहण्यासाठी घर नाही अशा मुलांना अनाथ म्हटलं जाते असे सांगितले.

डॉ. कालिदास शिंदे हे अनाथ बालकांसोबत काम करीत असतानाचे त्यांना आलेले अनुभव त्यांनी नमूद केले. विविध ठिकाणाहून आलेल्या बालकांमधून काही मूल ही स्वतःला अनाथ समजतात. परंतु अशा मुलांची सर्व माहिती समुपदेशकांनी काढल्यानंतर असे दिसून आले की, काही बालके सधन कुटुंबातील असून क्षुल्लक कारणावरून बालके स्वतःच्या घरातून पळ काढतात. कुटुंबात मुला- मुलींमध्ये केला जाणारा भेदभाव, राग, आर्थिक अडचणी, कुटुंबातील वाद, शिक्षणापासून दूर जाणारी अशा मुलांची संख्या जास्त आहे. तर काहींना शहराबाबत वाटत असणाऱ्या आकर्षणामुळे, अशी मुले स्टेशनवर राहतात. भूक लागल्यावर भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करतात. अशा मुलांना आसरा देऊन त्यांचे समुपदेशन समतोल फाऊंडेशन संस्थेद्वारे केले जाते. अशा विविध प्रकारच्या समस्यांना तोंड देणारी बालके आपल्या देशात आहेत. या बालकांना आपल्या सर्वांच्या मदतीची गरज आहे,

त्यांना संरक्षण देणे आवश्यक आहे याबाबत माहिती दिली. तसेच पीपीटी (PPT) चे माध्यमातून बालकांच्या संरक्षणाचे कायदे याबाबत माहिती देण्यात आली. यात

१. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५

२. बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, २०१२

३. मुलांना मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायदा,२००९

४. बाल विवाह विरोधी कायदा,२०१६

५. बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा,१९८६.

अन्य सबंधित बालकांचे कायदे यांची उदाहरणे देऊन माहिती देण्यात आली. तसेच शाळेतील विद्यार्थी सुरक्षितता याबाबत सद्यस्थितीत असणाऱ्या शाळेतील सेवा-सुविधा यांचा आढावा, माहिती घेण्यात येवून खालीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात आले.

१. शाळेतील शिक्षण कर्मचारी, वाहन चालक, सुरक्षा रक्षक, उपहारगृह,चालक या सर्वांची नियुक्ती करताना त्यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र पोलीस विभागाकडून घेतलेले असावे.

२. शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह हा मुलांचा अधिकार आहे. ती प्रसाधनगृह मुला- मुलींकरीता स्वतंत्र असावे.

३. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार शाळेतील विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अत्याचाराची तक्रार दाखल करण्यासाठी चिराग app, पोक्सो E-box वायएएनसीएचआय माहिती सूचनाफलक शाळेत लावण्यात यावे. सूचना देणेसाठी संवाद पेटी शाळेत असावी. त्याची माहिती बालकांना देणेत यावी.

४. बाल संवाद पेटी असावी.

५. शाळेत महिला व पुरुष सुरक्षा रक्षक असावेत.

६. शाळेत CCTV एएसएएनई गरजेचे आहे.

७. सर्व मुलांचे दूरध्वनी क्रमांक शिक्षक यांचेकडे असावेत. तसेच शिक्षकांचे दूरध्वनी क्रमांक मुलांकडे व त्यांच्या पालकांकडे असावेत.

८. समुपदेशनाची गरज असलेल्या बालकांसाठी DIET नावाच्या संस्थेशी संपर्क साधावा.

विद्यार्थी / बालक यांचे मध्ये लिंग भेदभाव नसावा, मुलांचा स्वाभिमान जपणे, बालकांचे ऐकुन घेणे, तसेच त्यांच्या शंकेचे वेळोवेळी निरसन करणे. तसेच मुलांवरील अत्याचाराची गोपनीयता राखणे गरजेचे आहे. तसेच बालकांच्या संरक्षणासाठी शासकीय यंत्रणा-बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, विशेष पोलीस पथक, बाल कल्याण पोलीस अधिकारी, जिल्हा पुनर्वसन समिती, बाल कामगार विरोधी कृती दल या बाबतची माहिती देणेत आली. तसेच बालकांचे संरक्षण करत असताना बालक दुर्लक्षित राहणार नाही याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. बालकांची पिळवणूक होण्यापासून, बालकास इजा होण्यापासून संरक्षण करणे, बालकांवर होणा-या अन्याय, अत्याचार, यापासून त्यांचे संरक्षण केले पाहिजे. याचबरोबर प्रत्येक बालकास जीवन जगण्याचा, संरक्षणाचा, सहभागाचा, विकासाचा अधिकार आहे. संविधानाने मंजूर केलेले मूलभूत अधिकार बालकास दिलेच पाहिजे.

सदरचा कार्यक्रम झाल्यानंतर श्री. विजय जाधव सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी आपल्या दौऱ्यादरम्यान जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, पालघर येथे भेट देऊन कार्यालयाच्या कामाचा आढावा घेतला. या मिटिंगसाठी बाल कल्याण समितीचे अध्यक्ष उपस्थित होते.

## ४. नाशिक येथील राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प कार्यशाळा कार्यक्रम :-

दिनांक ०६/०३/२०२० रोजी नाशिक येथील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प आणि कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम




महाराष्ट्र राज्य, बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य, मा.श्री.विजय जाधव यांचे आदेशाने व आयोगाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, नाशिक, यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प कार्यशाळा, नाशिक येथे कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने "नौरंग संस्था, मुंबई" व "समतोल फाऊंडेशन, ठाणे" यांच्या संयुक्त विद्यमाने, महाराष्ट्र राज्यातील १५ जिल्ह्यातील राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प यांचे कार्यालयातील कर्मचारी, प्रकल्प संचालक, क्षेत्र अधिकारी (फील्ड ऑफिसर), व्यवसाय प्रशिक्षक व कामगार अधिकारी कार्यालय, नाशिक यांचे कर्मचारी यांना समतोल संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प याविषयी सखोल माहिती देण्यात आली.

बाल कामगार विरोधी कायदा-१९८६, बाल कामगार यांचेशी बालकांचे संरक्षण कायदा, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००५ यामधील कलमे, पोक्सो कायदा-२००५, बाल विवाह प्रतिबंध कायदा-२००५, अमानवी वाहतूक प्रतिबंध कायदा, मोफत व सक्तीचा शिक्षणाचा कायदा, बाल हक्क संहिता, बालकांची सुरक्षा, बालकांचे संरक्षणाचे कायदे, बालकांचे हक्क व अधिकार, शासन यंत्रणा यांची भूमिका व काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके व त्यांच्या अडचणी, समस्या कशा पद्धतीने बाल कामगार कायद्याशी कशा जोडल्या आहेत. या विषयांबाबत विविध उदाहरणे देऊन समतोल संस्था, ठाणे यांच्या माध्यमातून १ दिवासीय जनजागृती प्रशिक्षण कार्यक्रम घेणेत आला.

आयोगाचे सदस्य, मा. श्री. विजय जाधव यांनी महाराष्ट्र राज्यातील १५ जिल्ह्यातील राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प यांचे कार्यालयातील कर्मचारी, प्रकल्प संचालक, फील्ड ऑफिसर; व्यवसाय प्रशिक्षक व कामगार अधिकारी कार्यालय, नाशिक येथील कर्मचारी यांचेकडून हा प्रकल्प राबवताना येणाऱ्या अडचणीबाबत आढावा घेतला.

राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प राबवताना तसेच बाल कामगार विरोधी कायदा, १९८६ ची अंमलबजावणी करत असताना कामकाजात येणाऱ्या अडचणी खालीलप्रमाणे –

१. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प अंतर्गत सर्वेक्षण दर दोन ते तीन वर्षांनी होते. यामुळे सर्वेक्षण केलेनंतर ज्या बाल कामगार बालकांना अनौपचारिक शिक्षणासाठी जोडणे आवश्यक असते, तिथे जोडता येत नाहीत. यामुळे अशी बालके शाळाबाह्य राहतात. बालके शाळाबाह्य राहिल्यामुळे ते बालमजुरीकडे वळतात.

२. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प व इतर शासकीय विभाग जिल्हाधिकारी, शिक्षण विभाग, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बालकामगार विरोधी पथक, जिल्हा पुनर्वसन समिती, अमानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष यांचा समन्वय होत नाही. त्यांचा इतर विभागाशी समन्वय नसल्यामुळे बालकाशी निगडीत विषयाबाबत गांभीर्य राहत नाही. यामुळे बालकांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासकीय यंत्रणा जबाबदारी घेत नाही.

३. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प व शासनाचे इतर शासकीय यंत्रणा या एकमेकांशी कशा जोडल्या आहेत, प्रत्येकाची भूमिका बालकाच्या संरक्षणाबाबत काय आहे ? की ज्यामुळे बालकांच्या कायदयांची अंमलबजावणी होत नाही.

४. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प अधिकारी यांना मर्यादित अधिकार आहेत. त्यामुळे बालकांबाबत काही निर्णय घेताना अडचणी येतात.

५. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प अधिकारी हे बालकामगार विरोधी कृतीदल धाड-सत्र यामध्ये सहभागी होत नाही.

६. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कार्यान्वित होतो. परंतु या प्रकल्पाबाबत आर्थिक खर्च, अहवाल, कामाचे नियोजन, बाल- कामगाराबाबत कार्यवाही करणे, एखाद्या बालकाची फसवणूक करून बालकामक गार म्हणून कामासाठी ठेवण्यात आलेल्या प्रकरणात गुन्हा नोंदवता येत नाही.

७. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प यामध्ये अनौपचारिक प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी यांना विद्यावेतन मिळत नाही. विद्यावेतनाचे अनुदान शासनाकडून वेळेवर मिळत नसल्यामुळे ते बालकापर्यन्त पोहोचत नाही.

८. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प अधिकारी यांची कंत्राटी भरती केली असल्याने कामगार विभाग व इतर शासकीय यंत्रणाना बाल कामगार यांच्यावरील कार्यवाही संदर्भात सहकार्य करत नाही.

९. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण वेळेवर मिळत नाही.

१०. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पास कमी व तुटपुंजी आर्थिक तरतूद असल्यामुळे बालकांसाठी व्यवसाय प्रशिक्षण उपक्रम राब- विताना साहित्य, साधने उपलब्ध करून देता येत नाही.

११. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प यांच्या जिल्हा पातळीवरील समितीच्या बैठका होत नाहीत. एखादी बैठक झाल्यास त्या बैठकीस बाल कामगार समिती मधील विविध विभागाचे प्रतिनिधी, सदस्य उपस्थित राहत नाहीत.

१२. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देणेत यावे.

१३. राष्ट्रीय बाल कामगार प्रकाल्पाअंतर्गत विशेष प्रशिक्षण केंद्र कर्मचाऱ्यांना दर महिन्याला मानधन मिळत नाही.

वरीलप्रमाणे राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प अधिकारी, कर्मचारी यांच्या अडचणी, वर नमूद केलेले विषय इ. संदर्भातील अडचणी सोडवण्याच्या दृष्टीने मंत्रालय, कामगार आयुक्त, जिल्हाधिकारी यांचे बरोबर महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाची बैठक आयोजित करण्यात यावी. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पांची जिल्हा पातळीवर योग्य अंमलबजावणी होण्यासाठी व प्रकल्पाच्या कामातील अडचणी सोडवून इतर शासन यंत्रणा यांचेसमवेत संपर्क, चर्चा, चर्चासत्रे, एकत्रित प्रशिक्षण, सर्वेक्षण, समन्वय साधून बालकांना हक्क व अधिकार मिळवून देणे, त्यांना समाजात सुरक्षित वातावरण निर्माण करून देण्याकरीता तसेच त्यावरील शासनाची भूमिका समजावून देण्यासाठी वरीलप्रमाणे मंत्रालय, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, जिल्हाधिकारी, शिक्षण विभाग व बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष व अन्य शासन यंत्रणा यांचेसोबत बैठक आयोजित करण्यात यावी. तसेच आयोगात राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प हा विषय चर्चेला घेण्यात यावा. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प यासंदर्भात महाराष्ट्र राज्य, बाल हक्क संरक्षण आयोग यांच्यासमवेत आढावा बैठक आयोजित करण्यात यावी.

**ड) आयोगाचे मा.अध्यक्ष व सदस्य यांनी दिलेल्या भेटी :-**

**I) मा. प्रवीण घुगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांच्या भेटी बाबत :-**

मा. प्रवीण घुगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व सदस्या डॉ. शालिनी कराड, श्री. विजय जाधव, व डॉ. वासंती देशपांडे तसेच मा. सीमा व्यास, भा.प्र.से., आयोगाच्या सचिव, डॉ. मंजुषा कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी, श्री. प्रमोद बाडगी, विधी सल्लागार हे दि.०८ जुलै, २०१९ रोजी आयोगाच्या बैठकी करीता पुणे येथे उपस्थित होते.

दि. ०९ जुलै :- मा. अध्यक्ष यांची जिल्हा सोलापूर शासकीय मुलांचे बालगृह (वरिष्ठ)या संस्थेस भेट.

दि. १० जुलै :- बाल कल्याण समिती, सोलापूर यांचा सोबत बैठक.

दि. ११ जुलै :- मुला- मुलींचे बालगृह पंढरपूर जिल्हा सोलापूर येथील एच. आय. व्ही. बाधित आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, सचिव व अधिकारी यांची संस्थेस भेट.

## II) मा. श्री. विजय जाधव, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांच्या भेटीबाबतः-

### १. दि. ०१.०७.२०१९ रोजी बालगृह उल्हासनगर-५ येथे भेट दिली.

बालकांच्या बाबतीत असणाऱ्या सुविधा व त्याची अंमलबजावणी हे शासकीय व निमशासकीय बालगृहांमध्ये नेहमीच चर्चेचा मुद्दा असतो अनेक ठिकाणी भेटी देऊन तेथील परिस्थिती बघून याबाबतीत सुचना जाऊन काही बदल झालेला नाही किंवा त्याकडे दुर्लक्ष केले जाते असे दिसते आहे. त्यापैकी –

अ. ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर क्र-५ मधील विकलांग बालगृहांमध्ये आजही स्वयंपाकी उपलब्ध नाही. स्वतः मुले अशक्त असुनसुद्धा जेवण बनवतात याबाबतीत अनेक वेळा चर्चा झाली आहे.

ब. अनेक संस्था मध्ये काळजीवाहक गेली अनेक वर्षे, १५ वर्षे पूर्ण झाली तरीही तिथेच आहेत, बदली झाली नाही. त्यामुळे त्यांना प्रशासनाची भीती वाटत नाही व ते मुलांची काळजी अजिबात घेत नाहीत. बालगृहांमध्ये तेच मालक असल्याचे वर्तन करताना दिसतात, याबाबतीत विचार करावा.

क. रिक्त पदे जास्त असल्यामुळे मुलांना अपेक्षित असे कोणतेही काम व कार्यक्रम होताना दिसून येत नाही. विकासात्मक धोरण नसल्यामुळे मुलांमध्ये तेथे राहूनही विकास होत नाही.

ड. मुलांसदर्भात कोणताही माहिती मागितली असता, मिळत नाही, डेटा ठेवला जात नाही, नव्याने निर्गमित होणा-या शासन निर्णयाप्रमाणे मुलांची नोंद केली जात नाही. अनाथ मुले नसतानाही, त्यांना अनाथ बोलले जाते.

असे अनेक विषय आहेत यावर गंभीरपणे चर्चा करून कार्यवाही होण्याची गरज आहे. यासंदर्भात महिला व बाल विकास विभाग आयुक्त यांच्याकडून विभाग निहाय माहिती मागवली तरच ती माहिती मिळु शकते.

### २. दि. ३१ जुलै रोजी वाशीम येथे भेट

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुलांच्या वेगवेगळ्या समस्या पहावयास मिळतात. यापैकी अकोला/ वाशिम/ यवतमाळ/ अमरावती/ बुलढाणा यामध्ये किशोरी माता यांच्याबाबत समस्या जास्त आहेत. तसेच या भागामध्ये पाण्याची समस्या असल्यामुळे अनेक कुटुंबे स्थलांतरित होत असतात. त्यामुळे मुलांच्या निवासी शाळेचा प्रश्न उद्‌भवत आहे. बालकामगार नसले तरी पालक जिकडे जातील तिकडे ही मुले पालकांबरोबर जात असतात व कामातही हातभार लावत असतात. त्याचबरोबर मुलांच्या शैक्षणिक समस्याही खूप मोठ्या आहेत. अनेक मुलेही एक पालक पद्धतीमध्ये आहेत. या सर्व गोष्टींबाबत चर्चा झाली. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या श्रीम.प्रज्ञा परांडे, सदस्या, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या डॉ. वासंती देशपांडे, सदस्या यांची भेट घेतली. श्री.ऋषिकेश मोडक, जिल्हाधिकारी यांचे समवेत बालकांच्या संदर्भात तसेच इतर विषयामध्ये विकासात्मक धोरण याबाबत चर्चा झाली. जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी यांचे समवेतही ग्रामीण भागातील शाळा या संदर्भात बरीच चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये वाशिम येथील काही जिल्हा परिषद शाळा उत्तमरित्या चालवत असून भेट देण्याचे ठरले.

राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांच्या तर्फे बालकांच्या हक्कांचे उल्लंघन याविषयावर जनसुनावणी कार्यक्रम वाशिम जिल्ह्याच्या नियोजन भवनात झाले. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, नवी दिल्ली च्या टिमने आधी येऊन सर्वेक्षण केल्यामुळे Child Line मार्फत काही तक्रार बालकांच्या संदर्भात आहे का याची माहिती घेण्यात आली. त्यामध्ये १२४ तक्रारी समोर आल्या. यामध्ये मुलांना शैक्षणिक मदत हवी असे प्रकार खूप होते. शिवाय एकल पालक मुले होती. अनेक मुलांनी घरी राहूनच शिकण्याची इच्छा व्यक्त केली. पॉक्सो प्रकरणांमधील ७ प्रकरणे मुलांची ओळख उघड करणे कायद्याने गुन्हा असल्यामुळे इन कॅमेरा होत्या. यावरही काही सूचना संबंधित अधिकारी यांना देण्यात आल्या. ७० केसेस झाल्यानंतर ज्या काही केसेस पोलीसांनी नीटपणे हाताळल्या नव्हत्या, चार्जशीट दाखल झाले नव्हते याबाबत चर्चा झाली व अधीक्षक विजयराव चव्हाण यांच्याकडून संबंधित अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या. शाळेबाबतही मुलांना दाखल करून न घेण्याबाबत तक्रारी होत्या. परंतु शाळेच्या इमारती व तेथील व्यवस्था याबाबत तक्रारी आल्या नाहीत. अखेरीस १२४ तक्रारीपैकी १०४ तक्रारीबाबत आदेश देण्यात आले. पत्रकार परिषद घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व विभागातले अधिकारी कार्यक्रमास उपस्थित होते.

### ३. आधारआश्रम, नाशिक या संस्थेला दि.१६ डिसेंबर, २०१९ रोजी भेट.

सदर भेटीचे वेळी खालील नमूद अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते :

१. श्री विजय जाधव, सदस्य, महाराष्ट्र राज्य बालक संरक्षण आयोग

२. डॉक्टर श्रीम. वृषाली देशपांडे, सदस्य, महाराष्ट्र राज्य बालक संरक्षण आयोग

३. श्रीमती सीमा व्यास, भाप्र.से. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

४ डॉक्टर श्रीमती मंजुषा कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य बालका संरक्षण आयोग

५. श्री. प्रमोद बाडगी, विधी सल्लागार, महाराष्ट्र राज्य बालक संरक्षण आयोग

६. श्रीमती पाटील, जिल्हा महिला बालविकास अधिकारी नाशिक

७. श्रीमती माधवी भोसले, अधीक्षक, महाराष्ट्र शिक्षण सेवा

८. श्रीमती माने, जिल्हा महिला बाल विकास अधिकार कार्यालय अहमदनगर संस्थेत भेट दिल्यानंतर पुढील गोष्टी आढळून आल्यात

अ) ३ वर्षाचे वरील आणि ७ वर्षाच्या खालील मुले ज्या कक्षात झोपवली होती त्या कक्षात प्रचंड दुर्गंधी येत होती. याबाबत सर्वांनी विचारणा केल्यावर श्री, राहुल जाधव, व्यवस्थापक यांनी "मुलांनी गादिवर सू केल्यामुळे व ती सोशली गेल्यामुळे वास येतो या वर डॉ. वृषाली देशपांडे, सदस्या यांनी बालकांच्या कक्षात एक्झॉस्ट फॅन बसविण्यात यावेत तसेच सर्व मुलांना झोपण्यापूर्वी सु करण्याची सवय लावावी व हवा खेळती राहण्याकरीता क्रॉस व्हेंटिलेशन उपाययोजना कराव्यात असे सुचविले. सदर कक्षात असलेल्या अस्वच्छतेबाबत विचारणा केली असता, त्यांनी दिलेली उत्तरे असमाधानकारक होती.

ब) खोलीमध्ये पुरेसे हवेशीर वातावरण नसल्याने तसेच हवा खेळती राहण्यासाठी तेथे खिडक्यांची व्यवस्था नसल्याने कोंदट वातावरण आढळले.

क) आधाराश्रम या संस्थेतील मुलांच्या संख्येच्या तुलनेत उपस्थित कर्मचारी वर्गाची संख्या कमी दिसून आली.

उपरोक्त अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नाशिक यांना करण्यात आलेल्या सूचना पुढीलप्रमाणे-

१. आधाराश्रम या संस्थेतील सर्व बालकांच्या संपूर्ण वैद्यकीय चाचणी शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत करून घेऊन त्याबाबतचा सविस्तर अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

२. खोलीमध्ये वातावरण खेळते रहाण्याकरिता योग्य ते बदल करून घेणेबाबत आपल्या स्तरावरून योग्य त्या कार्यवाहीचे आदेश देऊन त्याचा पूर्तता अहवाल तात्काळ आयोगास सादर करावा.

३. संस्थेमध्ये दाखल असलेल्या सर्व बालकांची स्वच्छता, आहार याबाबत काटेकोर सुव्यवस्था राखण्याबाबत निर्देश देऊन त्याबाबत अंमलबजावणीचा अहवाल आयोगास सादर करण्यात यावा.

उपरोक्त नमूद समस्या वगळता आधाराश्रम नाशिक येथील तपासणी अहवाल समाधानकारक होता.

**उपरोक्त अहवालाच्या अनुषंगाने आधाराश्रम, नाशिक या संस्थेस पुढील प्रमाणे सूचना करण्यात आल्या.**

१. संस्थेच्या पटावरील नोंदणीकृत बालकांची संपूर्ण यादी तपशीलवार विवरणासह सादर करावी.
२. व्यवस्थापनात कार्यरत अधिकारी कर्मचारी यांची विस्तृत यादी आयोगास सादर करावी.
३. बालकांच्या कक्षात ' Exhaust Fan ' बसविण्यात यावेत.
४. बालकांच्या वैद्यकीय तपासणी बाबत, संस्थेतील स्वच्छतेबाबत, संस्थेतील बालकांच्या खोल्या भरपूर प्रकाशमय व हवेशीर होण्याबाबत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नाशिक यांचे समन्वयाने पुढाकार घेऊन व उपरोक्त नमूद सर्व सूचनांची पूर्तता करून त्याबाबतचा अहवाल छायाचित्रणासह एक महिन्याच्या आत आयोगास सादर करण्यात यावा.

**III) प्रो. अस्मा शेख सदस्या, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांच्या भेटीबाबत**

१. दि.२५.०७.२०१९

दत्तक बालक जनजागृती आराखडा बैठकीत महाराष्ट्र राज्य, बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्या प्रो.अस्मा शेख, डॉ. वासंती देशपांडे व श्रीम. सीमा व्यास भा.प्र.से., सचिव, महाराष्ट्र राज्य, बाल हक्क संरक्षण आयोग, तसेच महिला व बा विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाचे उप-आयुक्त श्री. रवी पाटील, उप-आयुक्त (प्रशासन) श्रीमती. बिरारीस, इतर अधिकारी, संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यानंतर सोफोश संस्थेला बाल हक्क संरक्षण आयोगाने भेट दिली व कामाचा आढावा घेण्यात आला.



२. दि.२७.०७.२०१९

SOS चिल्ड्रेन व्हिलेज, पुणे या संस्थेच्या SOS दिनानिमित्त आयोजित विविध उपक्रमांना कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन, महाराष्ट्र राज्य, बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या प्रो. अस्मा शेख, उपस्थित होत्या. त्यावेळी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, बाल कल्याण समिती सदस्य, पत्रकार व संस्थेचे सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



३. दि.०२.१२.२०१९ व ०३.१२.२०१९

जिल्हा महिला व बाल विकास विभाग, पुणे, महाराष्ट्र शासन आयोजित चाचा नेहरू बाल महोत्सवास आयोगाचे सदस्य प्रो. अस्मा शेख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. त्यावेळी उपस्थित सौ. अश्विनी कांबळे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, सर्व बाल कल्याण समिती सदस्य, भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी, विविध संस्थांचे प्रमुख उपस्थित होते.



दि.२८.१२.२०१९ व ३१.१२.२०१९

दि.२८.१२.२०१९ रोजी पुणे जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या वतीने बाल मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य, बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्या प्रो. अस्मा शेख, उपस्थित होत्या. सदर मेळाव्यास मा. डॉ.श्री. हृषीकेश यशोद, भा.प्र.से. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे उपआयुक्त श्री. रवी पाटील व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, महिला व बाल विकास विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. तसेच दि.३१.१२.२०१९ रोजी जिल्हा महिला व बाल विकास पुणे विभाग आयोजित बक्षीस वितरण समारंभात आयोगाच्या सदस्या प्रो. अस्मा शेख, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.



दि.१८.०१.२०२० व १९.०१.२०२०

सेवा संगम कार्यक्रमात १०० पेक्षा जास्त संस्था एका व्यासपीठावर उपलब्ध होत्या व हा एक आनंददायी अनुभव होता. यामध्ये संस्थेमार्फत राबविण्यात येत असलेले विविध उपक्रमाची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे, यातून जनजागृती होऊन लोकांना जास्तीत जास्त सेवा मिळावी या संदर्भात प्रेरित करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या प्रो.अस्मा शेख, व सदस्य श्री. विजय जाधव, हे उपस्थित होते. त्यांनी या कार्यक्रमात मौलिक मार्गदर्शन केले.



दि.१०.०२.२०२०

पुणे महानगरपालिका शाळेतील मुख्याध्यापक व जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांचे एकत्रितपणे विद्यार्थी सुरक्षा या विषयावर महाराष्ट्र राज्य बाल हक्क सरंक्षण आयोग व समतोल फांऊंडेशन, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित केली होती. मुलांना असणारे अधिकार, हक्क, नियम जिल्ह्यातील प्रमुख यंत्रणा, मुलांना न्याय मिळवून देण्यासाठी असणारे नियम या विषयावर संवाद साधून शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य श्री. विजय जाधव, प्रा.अस्मा शेख (पटेल), तसेच आयोगाचे सचिव, श्रीम. सीमा व्यास, भा.प्र.से., आयोगाचे विधी सल्लागार, श्री. प्रमोद बाडगी व प्रशासकीय अधिकारी, डॉ. मंजुषा कुलकर्णी उपस्थित होते. सदर कार्यक्रमास शिक्षणधिकारी श्रीम. राऊत, श्री. दळवी व तसेच एकुण २५० शाळांचे मुख्याध्यापक हजर होते.



## <u>प्रकरण ७ शिक्षण क्षेत्रातील आयोगाचे विशेष योगदान :-</u>

**अनाथ मुलांना शाळाप्रवेश सुलभ करण्याकरिता "सरल" डेटाबेस मध्ये पर्याय उपलब्ध होण्यासाठी आयोगाने केलेले प्रयत्न**

१. बाल कल्याण समितीचे काही सदस्य आणि बालगृहातील पर्यवेक्षी कर्मचाऱ्यांनी आयोगाच्या निर्दशनास आणले की, अनाथ मुलांचे सरल पोर्टल मधील आवश्यक तपशील भरताना अडचणी येत आहेत. अनाथ मुलांबाबत त्यांच्या पालकांचे नाव, आडनाव, धर्म, प्रवर्ग याची माहिती नसल्यामुळे सरल पोर्टल मध्ये याबाबतची माहिती ते रकान्यांमध्ये शकत नाहीत, त्यामुळे अशा मुलांचे फॉर्म पोर्टलवर अद्यावत करता येत नाहीत. त्यामुळे त्यांनी या उद्‌भवलेल्या आकस्मिक अडचणींवर उपाय शोधण्याची विनंती केली.

२. सरल पोर्टलवर अनाथ मुलांची माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध व्हावी. त्यांना शिक्षणाची सुविधा प्राप्त करून देण्यासाठी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी दिनांक १६ जुलै, २०१९ रोजीचे पत्रान्वये यासंदर्भात मुल्यांकन करणेबाबत मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना उपरोक्त नमूद अडचणींना अनाथ मुलांना सामोरे जावे लागत असल्याबाबत अवगत केले. तसेच या मुलांच्या माहितीअनुषंगाने, पालकांचे आडनाव, धर्म याबाबत सदर शब्दांऐवजी "ज्ञात नाही" तसेच "प्रवर्ग" या शब्दाऐवजी "अनाथ" असा पर्याय उपलब्ध करून देण्यात यावा अशी मुलांच्या हिताच्या दृष्टीने विनंती केली. तसेच अशा मुलांचे शाळा प्रवेश झाल्यानंतर जर ते दत्तक घेतले गेले तर त्यांच्या पालकांचे नाव, आडनाव याबाबतची माहिती सरल पोर्टलवर अदयावत करण्यासाठी "नवीन नोंद " टॅब उपलब्ध करून देण्याबाबत विनंती करण्यात आली. ऑनलाईन आर.टी.ई. प्रवेश प्रक्रीयेत अनाथ बालकांबाबत केवळ "विदयार्थ्यांचे नाव" घ्यावे, तसेच त्यांचेसाठी उत्पन्नाची अट घालू नये, त्यांना प्राधान्याने प्रवेश दयावा या बाबत मा.मंत्री महोदय, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांना या सूचना समाविष्ट करून सरल पोर्टलमध्ये अनाथ बालकांना त्यांच्या शाळा प्रवेशासाठी येणा-या अडचणींचे निराकरण करण्याविषयी विनंती करण्यात आली.

३. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे मा. अध्यक्ष यांनी मंत्रालयातील संबंधित अधिकाऱ्यांसमवेत तसेच मा. मंत्री महोदय यांचे समवेत वरीलबाबत सातत्याने पाठपुरावा केला. या विषयावर आयोगाने घेतलेल्या पुढाकाराला प्रतिसाद देत, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र दि.१६.०८.२०१९ अन्वये १) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे आणि २) श्रीम. नंदीनी क्षीरसागर, संचालक (तांत्रिक), एन.आय.सी. पुणे यांना आयोगाच्या अध्यक्ष यांनी सरल पोर्टल मध्ये उपरोक्त सुचविलेले बदल/सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कळविले आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २३.०८.२०१९ रोजी उपरोक्त विषयाबाबत शासन निर्णय निर्गमित केला. या शासन निर्णयान्वये अनाथ मुलांच्या आर.टी.ई. प्रवेश प्रक्रीयेच्या अनुषंगाने कागदपत्र सादर करताना खालील प्रमाणे निंदेश देण्यात आले.

i. आर.टी.ई. २५% प्रवेशाकरिता बालगृहे/अनाथालये मधील विद्यार्थी या संवर्गाचा समावेश करण्यात यावा. तशी सुविधा एन.आय. सी., पुणे यांचेकडून पोर्टलमध्ये उपलब्ध करावी.

ii. अनाथ बालकांच्या प्रवेशाकरिता अनाथालयांची/बाल सुधारगृहांची कागदपत्रे ग्राहय धरण्यात यावी.

iii. अनाथ बालकांच्या संदर्भात इतर कागदपत्रे उदा. उत्पन्नाचा दाखला इ. आग्रह धरण्यात येवू नये.

iv. सरल डेटाबेस मध्ये अनाथ विद्यार्थ्यांकरिता एन.आय.सी.,पुणे यांनी विदयार्थ्यांचे पालक, नाव, आडनाव, धर्म या रकान्यात "माहित नाही" अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

v. अनाथ मुले शाळा प्रवेशानंतर दत्तक गेल्यास दत्तक घेणाऱ्या पालकाचे नाव, आडनाव अद्यावत करण्यासंदर्भात "नवीन नोंद" टॅब सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

४. उपरोक्त नमूद पत्र दि.१६.०८.२०१९ आणि शासन निर्णय दि.२३.०८.२०१९ हे सुलभ संदर्भासाठी सोबत जोडण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासन

ई मेलद्वारे

क्र. आरटीई-२०१९/प्र.क्र.१६०/एस.डी-१
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- १६/०८/२०१९

प्रति,

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) श्रीमती नंदीनी क्षीरसागर, तांत्रिक संचालक, एन.आय.सी., पुणे

विषय: सरल पोर्टलवर अनाथ विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधी येणाऱ्या अडचणींबाबत.
संदर्भ :-अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.मराबाहसंआ/अध्यक्ष/२६०, दि.१६ जुलै, २०१९.

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, सरल पोर्टलवर अनाथ विद्यार्थ्यांचे आई, वडील व आडनांव यांची माहिती उपलब्ध नसल्यास सदर माहिती पोर्टलद्वारे स्विकारली जात नाही. त्यामुळे अनाथ मुलांच्या प्रवेश प्रक्रीयेत अडचणी निर्माण होत आहेत. यास्तव सरल पोर्टलमध्ये खालीलप्रमाणे पर्याय उपलब्ध करुन देण्यात यावेत.

१) विद्यार्थ्यांचा पिता/आई यांचे नाव माहित नसल्याकारणाने मधले नाव या ठिकाणी NOT KNOWN सुविधा उपलब्ध असावी.

२) शेवटचे नाव- या ठिकाणी सुध्दा NOT KNOWN सुविधा उपलब्ध असावी.

३) Religion- Religion माहिती नसल्याकारणाने Other सोबत NOT KNOWN सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) Category- Category यामध्ये अनाथ असे नोंदविण्याची सुविधा उपलब्ध असावी.

५) अनाथ मुले शाळेत प्रवेशानंतर दत्तक गेल्यास दत्तक घेणाऱ्या पालकाचे नांव, आडनांव अद्ययावत करण्यासंदर्भात माहिती NEW ENTRY TAB द्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, बाल हक्क संरक्षण आयोग, तिसरा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०३०.

**आर.टी.ई.२५ टक्के प्रवेशांतर्गत अनाथ बालकांचे प्रवेश तसेच सरल डेटाबेस मध्ये अनाथ विद्यार्थ्यांकरिता सुविधा.**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक:आरटीई-२०१९/प्र.क्र.१६०/एस.डी.-१**

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २३ ऑगस्ट, २०१९

**वाचा :-** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.आरटीई-२०१८/प्र.क्र.३१५/एस.डी.-१, दिनांक १६ जानेवारी, २०१८

**शासन परिपत्रक:-**

शासन निर्णय दिनांक १६ जानेवारी, २०१८ नुसार राज्यात आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती निर्धारित केलेली आहे. सदर शासन निर्णयातील ई (४) मधील तरतूदींनुसार अनाथ बालकांबाबत अनाथालयाची कागदपत्रे ग्राह्य धरण्याचे निर्देश दिलेले आहेत. तथापि, अनाथ बालकांच्या प्रवेशांकरिता इतर कागदपत्रांची मागणी करण्यात येत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. सबब, सदर शासन परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत

१) आरटीई २५ टक्के प्रवेशाकरिता बालगृह / अनाथालये मधील विद्यार्थी या संवर्गाचा समावेश करण्यात यावा. तशी सुविधा एन.आय.सी., पुणे यांनी पोर्टलमध्ये उपलब्ध करावी.

२) अनाथ बालकांच्या प्रवेशाकरिता अनाथालयाची / बालसुधारगृहाची कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत.

३) अनाथ बालकांच्या संदर्भात इतर कागदपत्रे उदा.उत्पन्नाचा दाखला इ. विचारात घेण्यात येवू नयेत.

४) सरल डेटाबेस मध्ये अनाथ विद्यार्थ्यांकरिता खालील सुविधा एन.आय.सी., पुणे यांनी उपलब्ध करावी.

I. विद्यार्थ्यांचा पिता/आई यांचे नाव माहित नसल्याकारणाने **मधले नाव** या ठिकाणी NOT KNOWN सुविधा उपलब्ध असावी.

II. **शेवटचे नाव-** या ठिकाणी सुध्दा NOT KNOWN सुविधा उपलब्ध असावी.

III. **Religion-** Religion माहिती नसल्याकारणाने Other सोबत NOT KNOWN सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

IV. **Category-** Category यामध्ये अनाथ असे नोंदविण्याची सुविधा उपलब्ध असावी.

V. अनाथ मुले शाळेत प्रवेशानंतर दत्तक गेल्यास दत्तक घेणाऱ्या पालकाचे नांव, आडनाव अद्ययावत करण्यासंदर्भात माहिती NEW ENTRY TAB द्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२३१७२७०९६७२१ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Suvarna
Siddharth Kharat

Digitally signed by Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=065279b98828b1456ad0d62a97fa45eee948af8abe5a27104d4e132c5bd1d93a, cn=Suvarna Siddharth Kharat
Date: 2019.08.23 17:40:34 +05'30'

**(डॉ.सुवर्णा खरात)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई यांचे खाजगी सचिव
३) मा.सभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा.विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग
१०) मा.आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, सर्व
१३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
१५) संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे (संचालक, विद्या प्राधिकरण यांनी NIC शी संपर्क करून फी जाहीर करण्याकरिता सरल/RTE पोर्टलवर तात्काळ सुविधा उपलब्ध करावी व त्याची माहिती सर्व RTE २५ टक्के अंतर्गत रजिष्टर शाळांना द्यावी.)
१६) एन.आय.सी., पुणे
१७) शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका/ कटक मंडळे सर्व
१८) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व
१९) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने)
२०) निवडनस्ती (कार्यासन- एसडी-१)

## प्रकरण- ८ आयोगाने महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये केलेल्या काही शिफारसींचा सारांश.

१. तक्रार अर्ज नोंदणी क्रमांक १६१/२०१९

१. दि. ११.११.२०१९ रोजी संध्याकाळी ५ च्या सुमारास अर्जदार यांनी ई-मेल द्वारे आयोगास कळविले की, १६ वर्षे ५ महिने वयाच्या एका अल्पवयीन मुस्लीम मुलीचे तिच्या मर्जी विरुध्द अहमदनगर येथील रहिवासी, युवकाशी, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई येथे दि.१२.११.२०१९ रोजी सकाळी ११ वाजता लग्न आयोजित केले असल्याचे कळविले. सदर ई-मेल सोबत त्यांनी मुलीचा जन्माचा दाखला व लग्नाची निमंत्रण पत्रिका पाठवली.

२. सदर तक्रारीची तात्काळ दखल घेत आयोगाने त्याच दिवशी दि.११.११.२०१९ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर, पोलीस स्टेशन, गोवंडी, मुंबई-४३ यांना सदर नियोजित लग्नाची माहिती दिली तसेच सदर पोलीस स्टेशन येथे दूरध्वनीद्वारे पोलीस निरीक्षक श्री.पैठणकर यांच्याशी संपर्क साधून प्रकरणाचे गांभीर्याची कल्पना देऊन आवश्यक कार्यवाही करणेबाबत र्निदेश दिले.

३. सदर विषयाबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे, गोवंडी, मुंबई यांनी तत्काळ कार्यवाही करून बाल विवाह थांबवला या बाबत त्यांचे दि.१२.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास अहवाल सादर केला. सदर अहवालात त्यांनी नमूद केले आहे की -

vi. विवाहस्थळी मुलीच्या आई व आजोबा यांनी, मुलगी अल्पवयीन असून तिचा विवाह संपन्न होणार असल्याची माहिती पोलीसांना दिली.

vii. सदर विवाह हा बालविवाह प्रतिबंधक कायदयान्वये गुन्हा असल्याचे सांगून त्यांच्यावर तसेच नवरदेव व त्यांचे नातेवाईकांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते याची पोलीसांनी मुलीच्या नातेवाईकांना समज दिली.

viii. याबाबत आपल्याला कायदयाचे अज्ञान असून, त्यामुळे लग्न ठरवले गेले, परंतू हे लग्न बेकायदेशीर असल्याने सदर अल्पवयीन मुलीचा होणारा विवाह रद्द करीत असल्याचे मुलीच्या नातेवाईकांनी सांगितले.

ix. यासंदर्भात सर्व नातेवाईकांना आणि नवरदेव व त्याच्या नातेवाईकांना विवाह रद्द केला असल्याचे सांगितले. तसेच सदरमुलीला १८ वर्षे पूर्ण होत नाहीत तोपर्यंत तिचा विवाह करणार नाही असे तिच्या नातेवाईकांनी कबूल केले.

x. विवाहासाठीच्या हॉलचे व्यवस्थापक यांनीही हॉलचे केलेले बुकिंग रद्द केले असल्याचे सांगितले. मुलीच्या नातेवाईकांना तिचे होणारे लग्न रद्द करावे म्हणून पोलीसांनी त्यांना फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४९ अन्वये कायदेशीर नोटीस दिलेली आहे. अशाप्रकारे आयोगाने बालविवाह रोखण्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर केलेल्या त्वरित कार्यवाहीमुळे सदर बाब वेळेवर रोखण्यात आली.

२. तक्रार अर्ज नोंदणी क्रमांक २३७/२०१३

बाल हक्क संरक्षण आयोग कायदा २००५ च्या कलम १३(१)(जे) व १४(१) अन्वये.

श्रीमती अर्चना अशोक तिवारी तक्रारदार

विरुद्ध

श्रीमती. विजया सकपाल, माजी अध्यक्ष, बाल कल्याण समिती व इतर सात गैर तक्रारदार

अ. दि.०५.०२.२०१४ रोजी तक्रारदाराच्या तक्रारीनुसार, दि.२६.११.२०१३ रोजी १४ वर्षाच्या मुलाने तिच्या आठ वर्षांच्या मुलीचे एस.ओ.एस. बालग्राम, पुणे येथे लैंगिक शोषण केले होते. गैर तक्रारदार ६,एसओएस बालग्राम, पुणे येथील अधिकाऱ्यांनी २ दिवस या घटनेची दखल घेतली नाही. दि.२८.११.२०१३ रोजी सकाळी ११.५० वा. या घटनेची माहिती फिर्यादीला दूरध्वनीवरून कळविण्यात आली आणि त्यानंतर बाल कल्याण समिती यांनी त्या बालगृहात येऊन चौकशी सुरू केली. दि.२८.११.२०१३ रोजी तिच्या मुलीची प्रकृती ठीक नसूनही लवकर उपचार मिळाला नाही आणि बाल कल्याण समितीच्या वरील सदस्यांनी बाल देखभाल संस्थेच्या पाहुणचाराला अधिक प्राधान्य

दिले. तक्रारदाराच्या मुलीला रात्री रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि वैद्यकीय तपासणी दरम्यान तिला आणि मुलीला खूप त्रास सहन करावा लागला. वैद्यकीय अहवाल मिळाल्यावर तक्रारदारास तिच्यावर बलात्कार झाल्याचे समजले. तक्रारदार पुढे असे म्हणतात की, आयोगाने दि.३१.१०.२०११ च्या आदेशानुसार बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमच्या नियम २९(जी) नुसार मुला-मुलींना एकत्र ठेवू नये, असे निर्देश दिले आहेत. परंतु बाल संस्था आणि जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी यांनी उपरोक्त आदेशाची दखल घेतली नाही व त्या आदेशास नकार दिला आहे.

ब. आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली आणि गैर तक्रारदार एस.ओ.एस. बालग्राम, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, पुणे, बाल कल्याण समिती, पुणे यांना नोटीस बजावल्या व दि.११.०३.२०१४ आणि २५.०३.२०१४ रोजी सुनावणी घेण्यात आली. एसओएस बालग्राम, पुणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे यांनी या प्रकरणात हजर राहून आपले लेखी निवेदन दाखल केले.चौकशीच्या अनुषंगाने आयोगाकडून दि. २०.४.२०१९ रोजी खालील शिफारशी करण्यात आल्या आहेत.

१. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी बाल न्याय कायदा २००७ मधील नियम २९ (१) (फ) तसेच महाराष्ट्र बाल न्याय कायदा २००२ आणि सुधारित नियम २०११ मधील १६(२) चे उल्लंघन केल्याप्रकरणी सविस्तर चौकशी व खात्री करून संस्थेचे विश्वस्त, संबंधित शासकीय अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. जे जे ॲक्ट मधील तरतुदी व उपरोक्त चर्चा केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कारवाई करावी. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी अशी जबाबदारी निश्चित करण्यासाठी बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५ मधील कलम १५ (१) अन्वये संबंधित व्यक्तीविरुद्ध कारवाईस सुरु करून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

२. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना निर्देशित करण्यात येते की, पीडितेस रुपये ५०,०००/- नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कारवाई करावी. तसेच एस.ओ.एस. बालग्रामचे विश्वस्त यांनी सदर रक्कम पीडितेस प्रदान करावी.

३. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि. २८.०४.२०११ अन्वये देण्यात आलेल्या बालगृह तपासणीबाबत मार्गदर्शक सूचनांनुसार व तसेच जे.जे.ॲक्ट २०१५ मधील कलम ५४ अन्वये सूचनांचे पालन संबंधित यंत्रणा नियमितपणे करत आहेत का याची खातरजमा करावी.

४. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी बाल कल्याण समितीना कर्तव्य बजावण्यासाठी आवश्यक सहाय्यता करणारी प्रणाली उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, जसे सचिवीय आणि तांत्रिक सहाय्य इत्यादीमुळे त्यांना कर्तव्य अधिक कार्यक्षमपणे करण्यास मदत होईल.

५. एकात्मिक बाल संरक्षण योजनाअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा बाल संरक्षण युनिटची स्थापना महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी करावी. तसेच त्या युनिटला प्रशिक्षण व सहाय्य करावे.

६. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी बालगृहातील मुलांसाठी, तसेच इतर बालगृहातील कर्मचारी यांच्यासह सर्व संबंधित यंत्रणा व सेवा प्रदान करणारी यंत्रणा यांचे नियमित प्रशिक्षण घेवून क्षमता विकसित करण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन केले पाहिजे.

७. बाल न्याय कायदा २०१५ मधील कलम ४१ अन्वये बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांची नोंदणी जलदगतीने होण्यासाठी महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी खात्री करावी.

८. बाल कल्याण सेवा संस्थाना प्रतिसाद देणाऱ्या यंत्रणेसह, बाल संरक्षण धोरण तयार करण्यासाठी महिला व बाल विकास विभाग,महाराष्ट्र शासन यांनी कार्यवाही करावी.

९. सदर प्रकरण सन २०१३ पासून प्रलंबित असल्यामुळे, बाल न्याय मंडळ, पुणे यांनी जलदगतीने सदर प्रकरणी पीडितेच्या खटल्याची सुनावणी घ्यावी.

१०. या शिफारशीची प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सर्व संबंधितांकडे पाठवावी.

११. वरील शिफारशींची प्रत तक्रारदार व सर्व प्रतिवादींना माहिती व आवश्यक कार्यवाही साठी पाठविण्यात यावी.

प्रतिवादी एस.ओ.एस.बालग्राम यांनी तक्रारदाराच्या मुलीला उद्देशून दि.१२.०७.२०१९ रोजी पाठवलेल्या पत्राची प्रत ई-मेल द्वारे आयोगालाही पाठवली आहे. सदर पत्रातील तपशिलानुसार त्यांनी रु.५०,०००/- रकमेचा डिमांड ड्राफ्ट क्रमांक ००११९२ बँक ऑफ बडोदा, शाखा, पुणे हा तक्रारदाराच्या मुलीकडे दिला आहे. सदर पत्र तक्रारदाराच्या पोचपावती स्वरूपातील आहे. तसेच तक्रारदाराने दि.१२.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी भरपाईची रक्कम मिळाल्याबाबत माहिती दिली आहे.

३. तक्रार अर्ज नोंदणी क्रमांक २१५/२०१८-१९

श्री प्रमोद मारुती डेंगळे – तक्रारदार

विरुद्ध

शिक्षण संचालक, प्राथमिक, पुणे -१ – प्रतिवादी

१) तक्रारदाराची तक्रार अशी आहे की, एप्रिल २०१२ मध्ये त्यांनी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता मॉडर्न शिशु विद्यामंदिर शाळेचा & quot; छोटा गट मराठी माध्यम" शाळेत त्यांनी मुलीसाठी प्रवेश मिळवला. सदर शाळाही प्रतिवादी क्रमांक ४ यांचेद्वारे चालवण्यात येते.

२) तक्रारदाराने पुढे म्हटले आहे की,त्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असल्यामुळे, आरटीई अधिनियम २००९ अंतर्गत तरतुदीअन्वये वंचित गटातील मुलांसाठी राखीव कोट्यातून सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षासाठी मुलीचा शाळेत प्रवेश घेण्यासाठी दि.१२.०१.२०१३ रोजीचा अर्ज सादर केला. प्रतिवादी शाळेने त्यांच्या मुलीचे नावासह इतर ३४ मुलांची नावे शाळा प्रवेशासाठी निवड केली. तसेच सांगितले की, सदर प्रवेश, शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश नियमानुसार सोडती काढल्यानंतरच घेण्यात येतील.

३) निवडलेल्या मुलांच्या अंतिम यादीमध्ये त्यांच्या मुलीचे नाव नव्हते. मात्र शाळेने अंतिमतः निवड केलेल्या २० मुलांच्या यादीत अनाकलनीय व गुप्तपणे इतर मुलांची नावे आलेली होती.

४) तत्कालीन शिक्षण संचालक प्राथमिक यांनी दि.१२.११.२०१३ आणि दि.२६.१२.२०१३ अन्वये शिफारस पत्र दिले. सदर पत्र शाळेला देऊन त्याद्वारे तक्रारदाराच्या मुलीस सिनियर केजी मध्ये आर.टी.ई. अधिनियमा अंतर्गत, कोट्यातून प्रवेश देण्याबाबत निर्देशित केले.

५) शाळेने नोव्हेंबर २०१३ च्या मध्यात येण्याऐवजी, तक्रारदाराच्या मुलीस जून २०१४ मध्ये शालेय वर्ष सुरू झाल्यानंतर प्रवेशासाठी येण्यास सांगितले. त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांची मुलगी मॉडर्न शिशू विद्यामंदिर येथे परत पाठवण्यास सुरुवात केली. जून २०१४ मध्ये जेव्हा प्रवेशाची पद्धत ऑफलाईन वरून ऑनलाईन केली गेली, त्यावेळी प्रतिवादी क्रमांक ४ शाळेचे मुख्याध्यापक यांनी तक्रारदारास प्रतिवादी क्रमांक १ यांचे कडून आरटीई अंतर्गत आरक्षित कोट्यात प्रवेशासाठी शिफारशीचे अनुषंगाने प्रतिवादी क्रमांक १ यांना अर्ज करावा व त्यांचेकडून शाळेसाठी पत्र घ्यावे असे सांगण्यात आले. त्याप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ यांनी दि.१९.०६.२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिवादी क्रमांक ४ शाळेने आरटीई अंतर्गत आरक्षित कोट्यात सीनियर केजीमध्ये तक्रारदाराच्या मुलीचा प्रवेश देणेबाबत सूचित केले.

६) शाळेने त्यांच्या मुलीचा शाळेत प्रवेश देऊन त्यांच्याकडून एका प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी घेतली. ज्यामध्ये नमूद होते की, राज्य शासनाने प्रतिपूर्ती केली नाही तर, तक्रारदार स्वतः शाळेची फी भरतील.

७) आरटीई अंतर्गत कोट्यातून मुलीला शाळेत प्रवेश मिळाला. मात्र राज्याने फीच्या रकमेची प्रतिपूर्ती केली नाही. याबाबत त्यांना प्रतिवादी शाळेने दि. २४.०८.२०१७ आणि दि.०१.०९.२०१७ रोजी चे पत्रान्वये मागील तीन वर्षांची फी प्रलंबित भरण्यास सांगितले. तक्रारदार यांनी प्रथम प्रतिवादी शाळेच्या दि. ३१.०८.२०१७ रोजीच्या पत्रास नोटीसद्वारे आव्हान दिले. शाळे विरुद्ध माननीय मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक ५६०/२०१८ हे प्रकरण दाखल केले. माननीय उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रियेसंदर्भात शिफारस पत्र देण्याची अशी पद्धत नाही. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश दि.२२.०३.२०१८ अन्वये तक्रारदारास दावा मागे घेण्यास परवानगी दिली. त्याचवेळी प्रतिवादीस शाळेत प्रलंबित फी, चार हप्त्यांमध्ये भरण्याची परवानगी दिली. या आदेशाचे पालन करीत तक्रारदाराने दोन हप्ते आधीच भरले होते आणि उर्वरित दोन हप्त्यांचे पुढील दिनांकाचे धनादेश प्रतिवादी शाळेत जमा केले आहेत.

८) शाळेने बेजबाबदार पद्धतीने वागून आरटीई कायद्यातील कोट्यातून त्यांच्या मुलीला शिक्षण घेण्याच्या त्यांच्या हक्कापासून वंचित राहण्यास भाग पाडले आणि अशा गंभीर निष्काळजीपणाच्या कृत्यामुळे आरटीई कायद्याचे उद्दिष्ट यशस्वी झाले नाही व ते पूर्ण झाले नाही. म्हणून तक्रारदाराने सदर तक्रार दाखल करून तक्रारीत याबाबत न्याय मिळावा अशी प्रार्थना आयोगास केली होती. सदर प्रकरणी सुनावणी व संबधितांचे लेखी म्हणणे या आधारे आहे.

आयोगाने खालील शिफारशी दिल्या आहेत.

(अ) प्रतिवादी क्रमांक १, संचालक ,प्राथमिक शिक्षण संचालनालय पुणे, महानगरपालिका पुणे, (प्रशासकीय अधिकारी प्राथमिक शिक्षण पुणे महानगरपालिका पुणे) यांना निर्देशित करण्यात येते की, तक्रारदारांना आवश्यक सहाय्य करावे आणि तक्रारदाराच्या मुलीची उचित वर्गामध्ये शासकीय अनुदानित / शासन मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित जवळच्या शाळेत,पात्रतेनुसार प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.

(ब) आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, पुणे यांना निर्देशित करण्यात येते की, आर.टी.ई. प्रवेश प्रक्रिया ही आर.टी.ई. अधिनियम २००९ आणि त्याचे नियमातील तरतुदीनुसार पारदर्शक, निष्पक्ष आणि योग्य व समान पद्धतीने राबवण्यासाठी योग्य ती पावले उचलण्यात यावीत.

(क) आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, पुणे यांना निर्देशित करण्यात येते की, आर.टी.ई. प्रवेश प्रक्रिया सन २०१३-१४ च्या संदर्भात चौकशी करावी. प्रतिवादी क्रमांक ४ शाळा आणि संबंधित व्यक्ती विरोधात लक्षात घेतलेल्या उणिवा, चुका आणि त्याबाबतची योग्य ती कारवाई करून अनुपालन अहवाल कळवावा.

(ड) आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, पुणे यांना निर्देशित करण्यात येते की, दि.१२.११.२०१३, दि.२६.११.२०१३ व दि.१९.०६.२०१४ रोजीची शिफारस पत्र देण्यास जबाबदार असणारे अधिकाऱ्यांविरुद्ध योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करावी व अनुपालन अहवाल कळवावा.

(इ) आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, पुणे यांना निर्देशित करण्यात येते की, आर.टी.ई. प्रवेशाच्या संदर्भात शाळांकडे कोणत्याही अधिकाऱ्यांमार्फत शिफारस पत्र दिली जात नाहीत, याची काळजी घेण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावी.

(फ) आयोगाच्या शिफारशींची प्रत आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, पुणे, तक्रारदार आणि प्रतिवादी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठवावी.

४. तक्रार अर्ज नोंदणी क्रमांक. ६३/२०१७-१८

कार्मेलिना पी. डावरिया - तक्रारदार

विरुद्ध

अधीक्षक, फातिमाश्रय,

फातिमा माता सदन, महाकाली केव रोड,

अंधेरी (पु.), मुंबई-९३ समिती व इतर चार - गैर तक्रारदार

(१) कारमेलिन पी. डावरिया यांनी त्यांच्या दिनांक १२/०१/ च्या अर्जाद्वारे दिलेल्या तक्रारीनुसार, अल्पवयीन अनाथ मुलगी (एक्स.एक्स.एक्स.) वय १६ वर्षे असून ती फातिमाश्रय कॉन्व्हेंट, अंधेरी येथे राहत होती आणि वयाच्या तिसऱ्या वर्षापासून त्रास दिला जात आहे. कारण त्यांचा असा विश्वास होता की, काही मुली अगदी लहान वयातच लैंगिक संबंधात गुंतल्या आहेत आणि या मुलीला एक्स.एक्स.एक्स ला या कॉनव्हेंट मधील नन्सकडून खुप मारहाण केली होती, काहीवेळा त्यांना काही अनैसर्गिक गोष्टी करण्यास भाग पाडले जात असे. पुढे असेही म्हणण्यात आले आहे की, ती मुलगी खूप अंतर्मुख झाली, आत्मविश्वासाचा अभाव होता आणि त्याचा तिच्या अभ्यासावर परिणाम होतो आणि तिला हायपर थायरॉईडच्या समस्येने ग्रासले असल्याने आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या. पुढे असे म्हणण्यात आले आहे की, मानसिक छळ व टोमणे मारून छळ केल्यामुळे तिला नॅशनल ओपन स्कूलमधून दहावी पूर्ण करता आली नाही. तिला सहन न झाल्यामुळे तिने कॉन्व्हेंटमधून पळून जाण्याचे ठरवले. दि. २५ नोव्हेंबर २०१७ रोजी या मुलीने चाईल्ड लाईनवर कॉल केला. चाईल्ड लाईन तिला अंधेरी स्टेशन येथे भेटले आणि तिचे म्हणणे ऐकल्यानंतर एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात आपली तक्रार नोंदविण्याचा निर्णय घेतला आणि त्याच

दिवशी रात्री साडेअकरा वाजता, त्या मुलीला डोंगरी चिल्ड्रन होममध्ये नेण्यात आले. तक्रारदाराने पुढे दावा केला की, ती त्या मुलाची शिक्षिका होती आणि इयत्ता दहावीत शिकवते. तेव्हा तिला कॉन्व्हेंटमध्ये असलेल्या मुलीने होणारा छळ व तिच्या समस्येविषयी माहिती मिळाली आणि त्यांनी आई व मुलीचे नाते विकसित केले आहे. ती मुलगी सर्व काही तिच्याकडे सांगत असे. तक्रारदाराने पुढे असा दावा केला की, या मुलीने आत्महत्या करण्याची प्रवृत्ती व स्वतःचे नुकसान करण्याची प्रवृत्ती असल्याने, तिच्या मुलीचे कल्याण जाणून घेण्यासाठी तिने मोबाइल दिला होता. ही मुलगी तक्रारदाराशी बोलण्यात सहजता होती आणि तक्रारदार तिला नैतिक आधार व आत्मविश्वास देत होता. पुढे असे म्हणण्यात आले आहे की, या मुलीने कोणालाही या घटनेचा खुलासा करून चर्चा करू नये असा इशारा दिला होता आणि तक्रारदाराने असे केल्यास ती आत्महत्या करून स्वतःचे नुकसान करेल. तक्रारदाराने आपल्या तक्रारीच्या प्रार्थना कलमात, दिनांक २५ नोव्हेंबर, २०१७ रोजी या मुलीने दिलेल्या तक्रारीसंदर्भात मुद्दे उपस्थित केले, पोलीसांकडून हरवलेली तक्रार नोंदवणे, अपहरणाचा गुन्हा दाखल करणे, पोक्सो कायद्यांतर्गत तक्रार न नोंदवणे, कारवाई न करणे, डोंगरी चिल्ड्रन होममध्ये एका महिन्यापेक्षा जास्त काळ या मुलीचे वास्तव्य, तिचे शिक्षण, तिची आरोग्याची समस्या, ज्या व्यक्तीसमवेत सहजसुलभ आहे, त्या व्यक्तींना भेटू न देण्याबाबत, तिचे वयाची पडताळणी आणि तिने तिला त्या मुलीला भेटण्याची प्रार्थना केली होती.

(२) प्रतिवादी क्र.१. अधीक्षक, फातिमाश्रय प्रतिवादी क्रमांक २. सीसीडीटी, चाइल्ड लाईन, वांद्रे (पश्चिम), मुंबई, प्रतिवादी क्रमांक ३. अधीक्षक, डोंगरी बालगृह, उमरखेडी, मुंबई, प्रतिवादी क्रमांक ४ बाल कल्याण समिती, मुंबई शहर-२ आणि प्रतिवादी क्रमांक ५. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, मुंबई, यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

(३) प्रतिज्ञापत्राच्या उत्तरात, प्रतिज्ञापत्रातील माहितीवरून हे लक्षात आले आहे.

प्रतिवादी क्र.१. मार्फत चालविण्यात येणाऱ्या बालकाची काळजी घेणारी संस्थेची नोंदणी झालेली नाही आणि त्यांनी त्यांच्या संस्थेत १० मुलींना प्रवेश दिला होता. प्रतिवादी क्रमांक २ सीसीडीटी, चाईल्ड लाईन आणि प्रतिवादी क्रमांक ४ बाल कल्याण समिती, मुंबई शहर-२ यांना प्रतिवादी क्रमांक १ च्या संस्थेने नमूद केलेल्या दहा प्रवेशितांच्या प्रवेशासाठी घेतलेल्या प्रक्रियेसंदर्भात तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. मुलांना पालकांच्या ताब्यात देण्याची प्रक्रिया आणि बाल हक्क अधिनियम,२००५ च्या आयोगाच्या कलम १३(१) (आय) च्या तरतुदीनुसार त्यामध्ये ३ प्रवेशित कसे दाखल करण्यात आले होते, या अनुषंगाने जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि. २० फेब्रुवारी, २०१९ रोजी आयोगाला पत्र पाठवून सी.डब्ल्यू. सी. चे सदस्य, चाइल्ड लाईनचे सदस्य, अधीक्षक, कस्तुरबा महिला आश्रम आणि डी.डब्ल्यू.सी.डी.च्या परिवीक्षा अधिकारी या सदस्यांचा समावेश असलेल्या समितीने दिनांक १५ व २७ जानेवारी, २०१९ रोजी करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल सादर केला. या अहवालाची प्रत प्रतिवादी क्र.१ फातिमाश्रय यांना उपलब्ध करून दिली होती व अहवालासंदर्भात त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्यास सांगितले. त्या अनुषंगाने, प्रतिवादी क्रमांक १ फातिमाश्रय यांनी दि.२६.०३.२०१९ रोजी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.२०.०२.२०१९ रोजी दिलेल्या पत्रानुसार आयोगाच्या निर्देशान्वये केलेल्या तपासणीअनुषंगाने तपासणी अहवालामध्ये प्रतिवादी क्र. २ सीसीडीटी, चाईल्ड लाइन व प्रतिवादी क्र.४ बालकल्याण समिती १५ व २७ जानेवारी, २०१९ रोजी या अहवालात नमूद केलेली संस्था, मुलाच्या एक्स.एक्स.एक्स.च्या प्रकरणातील सद्यस्थितीतील तक्रारीचा विषय आणि संस्थेची सद्यस्थिती आणि सुमारे २१ प्रकरणांचा तपशील उपलब्ध आहे. सदर तपासणी अहवालातील परिच्छेद क्रमांक १ ते २१ मध्ये असे नमूद केले आहे की, सन २००३ ते २०१८ या कालावधीत, उपलब्ध नोंदवही नुसार त्या आश्रमात २३ मुलींना दाखल करण्यात आले होते. या मुलींना स्वयंसेवी संस्थांमार्फत आणि पालकांनी केलेल्या विनंतीनुसार, चर्चने संबंधित मुलांना बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम -१५ च्या कलम ३१ नुसार प्रवेश दिला होता. बाल कल्याण समितीसमोर काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना उपस्थित करण्याबाबत आणि कलम ३२ नुसार चाईल्ड लाइन सेवा किंवा जवळच्या पोलीस स्टेशनला किंवा बाल कल्याण समितीला किंवा जिल्हा बाल संरक्षण युनिटला, पालकांपासून विभक्त झालेल्या मुलासंदर्भात अनिवार्य अहवाल देण्याच्या प्रक्रियेचे पालन केले गेले नाही. या तपासणी अहवालात पुढे नमूद केले आहे की, संस्थेचे दस्तऐवज महिला व बाल विकास विभागाच्या नियमांनुसार ठेवली जात नाहीत. तद्नंतर असे सादर केले गेले आहे की, त्यांनी स्वयंसेवी संस्थेमार्फत आणि पालकांच्या विनंतीवरून मुलींना प्रवेश देणे सुरू केले. उपलब्ध रेकॉर्डवरून असे आढळले की, २००३ ते २०१८ दरम्यान आश्रमात एकूण २३ मुली दाखल झाल्या.

आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की २३ प्रवेशितांपैकी, ४ प्रवेशित वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांकडून आणि १ प्रवेशित चर्च च्या संदर्भाने दाखल झाले आहेत. उर्वरित १८ मुलींना पालक आणि नातेवाईकांनी दाखल केले. पुढे असे नमूद केले आहे की, आश्रमातील प्रवेशितांच्या प्रवेशाच्या वेळी अधिकारी बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियमातील तरतुदींचे पालन करत नाही. आश्रम आणि स्वयंसेवी संस्थांकडून जे.जे. कायद्यांतर्गत विहित केलेल्या नियमांचे पालन करण्याची तसदी घेण्यात आली नाही आणि सीडब्ल्यूसीकडे या प्रकरणांचा पाठपुरावा केला नाही.

- मुलाच्या एक्स.एक्स.एक्स.च्या संदर्भात, सध्याच्या तक्रारीच्या विषयावर असे सांगण्यात आले की, तिला

अनमोल ऑर्गनायझेशन, वडाळा यांनी दिनांक १९.०९.२००३ रोजी, वयाच्या ३ वर्षांची असताना ठेवली होती. प्रतिसादकर्ता क्रमांक १ फातिमाश्रय यांनी सादर केल्यानुसार, त्यांनी तिच्या पालकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचा शोध लागला नाही. अहवालात असे नमूद आहे की पालकांना शोधण्यासाठी संस्थेने केलेल्या प्रयत्नांचा पुरावा सापडलेला नाही. या मुली पळुन जाण्याची घटना आणि त्यानंतर आशासदनमध्ये तिची सीडब्ल्यूसीच्या आदेशानुसार बदली झाल्याच्या अहवालात असे नमूद आहे की, प्रतिवादी क्रमांक १ संस्थेने सादर केल्यानुसार, त्यांनी कबूल केले आहे की, ते कायदेशीर व्यक्ती नाहीत आणि त्यांना कायद्याचे ज्ञान नाही. तसेच त्यांनी जे. जे. अधिनियमान्वये नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे आणि प्रक्रियेदरम्यान त्यांना समजले की जे.जे. कायद्याची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी त्यांच्याकडे कर्मचारी नाहीत आणि विश्वस्तांनी हे केंद्र बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सीडब्ल्यूसी, मानखुर्द यांनी मुलांना पालकांच्या ताब्यात देण्यास सांगण्यात आले आणि मुलांच्या हिताच्या दृष्टीने एस.एस.सी. मध्ये शिक्षण घेणाऱ्या तीन मुलींना त्यांच्या पुढील भविष्यावर परिणाम होऊ नये म्हणून त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत राहण्याची परवानगी देण्यात आली होती. सीडब्ल्यूसीच्या परवानगीने जे.जे.अधिनियमानुसार योग्य कागदपत्रे आणि खालील नियमांच्या संदर्भात विश्वस्त यांनी कबूल केले की, त्यांना कायदेशीर प्रक्रियेची माहिती नव्हती आणि घोषित केले की, यात कोणताही गैरहेतू नव्हता. नियम- कायद्यांचे पालन करण्यास अडचण लक्षात घेऊन ट्रस्टनी हे केंद्र बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, ते परिपूर्ण मनुष्य नाहीत आणि त्यांच्याकडून काही हलगर्जी झाली असल्यास त्याबाबत क्षमा असावी. वरील तपासणी अहवालातील बाबी विचारात घेतल्यास, प्रतिवादी क्र.१ फातिमाश्रय यांनी नमूद केलेल्या तपासणी अहवालाला दिलेला जबाब, कार्यवाहीसाठी पक्षांचे निवेदन आणि नोंदी पाहिल्यावर असे दिसून येते की, प्रतिसादकर्ता क्रमांक १ संस्थेची सुरुवातीपासून आजपर्यंत जे.जे. कायद्याच्या तरतुदीनुसार नोंदणी केलेली नाही. तसेच त्यांनी त्यांच्या संस्थेत असलेल्या प्रवेशितांच्या प्रवेश व सुट्टीच्या संदर्भात, आवश्यक जे.जे. कायद्याच्या संबंधित तरतुदींचे पालन केले नाही. संस्था आजपर्यंत नोंदणीकृत नसून काळजी घेण्याची गरज असलेल्या मुलांना काळजी व संरक्षण पुरविण्याच्या कामात सामील असून विवादित नाही. असे दिसून येते की, प्रतिवादी क्रमांक १ संस्थेने बाल कल्याण समितीसमोर मुलांच्या उपस्थितीच्या विहित प्रक्रियेचे पालन केले नाही आणि जेजे कायद्याच्या तरतुदीनुसार पालकांपासून विभक्त आढळलेल्या मुलासंदर्भात अनिवार्य अहवाल सादर केला नाही. तसेच प्रतिवादी क्रमांक १ संस्थेने महिला व बाल विकास विभागाच्या निकषांनुसार अभिलेख ठेवलेला नाही, ज्यावरून त्यांनी दाखल केलेल्या मुलांची संख्या आणि त्यांची संस्था सुरू झाल्यापासून त्यांनी संस्थेतून मुक्त केलेल्या मुलांची संख्या स्पष्टपणे दिसून येईल. प्रतिसादकर्ता क्रमांक १ संस्थेच्या १४ राज्यांत जवळपास ९० शाखा आहेत. हे निर्विवाद दिसून येत आहे. अशा परिस्थितीत असे दिसून येते की, प्रतिवादी क्रमांक १ संस्थेच्या सदर केलेल्या म्हणण्यानुसार, असे कोणतेही पुरावे नसले की ते कायदेशीर व्यक्ती नसतात व त्यांना कायदेशीर ज्ञान नसते. कारण कायद्याचे अज्ञान हे निमित्त व पळवाट असू शकत नाही हे स्पष्ट आहे. तसेच हेही वादग्रस्त आहे की, प्रतिसादकर्ता क्रमांक १ फातिमाश्रय यांनी जे.जे.कायद्याच्या तरतुदीनुसार मिळालेली मुले त्यांच्याकडून बाल कल्याण समितीपुढे उपस्थित केली नाहीत आणि विभक्त मुल आढळल्याची नोंद करण्यासाठी आवश्यक पावले उचलली नाहीत. पालकांकडून प्रतिवादी क्र. १ संस्था कायद्यानुसार ठरविलेल्या पद्धतीचा अवलंब केला गेला असता तर, बरीच मुलं बाल कल्याण समितीच्या कार्यक्षेत्रात आली असती आणि त्यांनी त्या मुलांच्या पालकांच्या शोधात पाऊल उचलले असते. मुले त्यांच्या पालकांकडे, किंवा ज्या मुलांना पालक शोधू शकले नाहीत किंवा अनाथ आहेत त्यांना मुले कायद्यात विहित केलेल्या प्रक्रियेचे पालन करून पालनपोषण करता येईल आणि सांगितलेली मुले पुनर्वसनाच्या फायद्यापासून वंचित राहिली नसती. तसेच जे.जे.कायद्याच्या तरतुदीनुसार सामाजिक एकत्रीकरणसारख्या फायद्यांपासून वंचित राहिली नसती. अशा परिस्थितीत बाल देखभाल संस्था नोंदणी न करणे, सी.डब्ल्यू.सी. समोर मुलांना उपस्थित न

करणे आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे पालकांपासून विभक्त आढळून आलेल्या मुलासंदर्भात अनिवार्य अहवाल सादर करण्यात अपयश आल्याचे दिसून येते.

प्रतिवादी क्र.१ संस्था ही जे.जे. कायद्याच्या तरतुदीनुसार गुन्ह्याच्या कृतीमध्ये जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणाने गुंतलेली आहे. प्रतिवादी क्र .१ संस्थेची सदर कृती आणि त्यांची चुक तसेच मुलांच्या हितावर होणारे परिणाम लक्षात घेता, मुलांच्या हिताच्या दृष्टीने आयोगाचे असे मत आहे की, आयोगाला माफी स्वीकार करण्यासाठी कोणतेही समाधानकारक कारण दिले गेले नाही. आयोगाने या प्रकरणी पुढील शिफारसी केल्या आहेत :-

(१) कमिशनचे मत आहे की, मुल एक्स.एक्स.एक्स.च्या हिताच्या दृष्टीने फिर्यादीला त्या मुलाला एक्स.एक्स.एक्स.ला भेटण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही.

(२) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रतिवादी क्र.१ संस्था बाल देखभाल संस्थेची नोंदणी न करणे, सीडब्ल्यूसीसमोर मुलांना उपस्थित न करणे आणि जे.जे. कायद्याच्या तरतुदीनुसार पालकांपेक्षा विभक्त आढळल्यासंदर्भात अनिवार्य अहवाल संबंधित अधिकाऱ्यांकडे देण्यात अपयशी ठरल्याबाबत संस्थेच्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर जे.जे. कायद्याच्या तरतुदीनुसार गुन्हा नोंदविण्यासंदर्भात आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे.

(३) तपासणी अहवालातील निरीक्षणे लक्षात घेता, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना पुढील तपास, कागदपत्रांची तपासणी, नातेसंबंधाची तपासणी, कुटुंब /पालक शोधण्यासाठी केलेली तपासणी, पुनर्वसन, मुलांचे संस्थात्मकरण यासाठी तपासणी अहवालात नमूद केल्याप्रमाणे, आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत आणि अनुपालन अहवाल सदर करण्यास सूचित केले आहे.

(४) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना हे तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत की, तपासणी अहवालात नमूद केलेल्या सर्व मुलांचे जे. जे. कायद्याच्या तरतुदीनुसार पुनर्वसन करण्याबाबत आवश्यक ती पावले उचलुन अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा.

(५) आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांना सन २०१० मध्ये प्रतिवादी क्र.१ फातिमाश्रय यांनी सादर केलेल्या नोंदणीचा अर्ज अद्याप कोणत्या कारणासाठी प्रलंबित आहे याबाबत चौकशीकरीता लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

(६) आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांना दिनांक २८ एप्रिल २०११ आणि दिनांक २२ डिसेंबर २०११ रोजीच्या वरील शासकीय ठरावानुसार प्रतिवादी क्रमांक १ च्या बालगृहाची तपासणी करण्याची जबाबदारी सोपविलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी व संबंधितांवर योग्य कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर बालगृहाची नोंद न घेतल्याबाबत, तसेच उक्त बालगृह वगळण्यासंदर्भात वरील बालगृहावर योग्य ती कारवाई सुरू करणे आणि सदर बालगृहाची नोंदणी न करता कार्य करण्यास परवानगी देणेसंदर्भात संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे.

(७) आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांना बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २०१५ च्या तरतुदीनुसार राज्यातील बाल देखभाल संस्थांच्या नोंदणीविषयी आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच नोंदणी नसल्यास योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले.

(८) या शिफारसींची प्रत तक्रारदार, प्रतिवादी, संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आणि आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठवण्यात यावी. तसेच वरील संदर्भातील तपासणी अहवालाची प्रत संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिका-यांना सल्ल्याच्या शिफारशीसह पाठवण्यात यावी. आयोगात दाखल असलेल्या तक्रार प्रकरणांचे अनुषंगाने खालील प्रकरणांबाबत अंतिम कार्यवाही करण्यात आली.

## प्रकरण :- ९ "अ" तक्रारींचा तपशील तक्रारीचा तपशील

**सन २०१९-२० या कालावधीत प्राप्त झालेल्या, निकाली काढलेल्या व प्रलंबित तक्रारींचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र**

| वर्ष<br>(१) | वर्षाच्या सुरूवातीस प्रलंबित प्रकरणे<br>(२) | नवीन तक्रारी<br>(३) | एकूण<br>(४) | निकाली काढलेली प्रकरणे<br>(५) | वर्षाच्या शेवटी प्रलंबित प्रकरणे<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | ३२५ | १९६ | ५२१ | १३२ | ३८९ |

## प्रकरण १० ऑडिटरचा अहवाल व ताळेबंद अहवाल

लेखा विवरण पत्र महालेखपाल यांना सादर केले आहे. लेखा परीक्षणानंतर ऑडिटेड स्टेटमेंट सभागृहात सादर करण्यात येईल.

# MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS, MUMBAI

## ACCOUNTANTS REPORT ON COMPILATION OF UNAUDITED FINANCIAL STATEMENTS

बाल हक्क संरक्षण आयोग
महाराष्ट्र शासन

For the Year Ended
31th March 2020

INDIA

RATAN RATHI & CO
CHARTERED ACCOUNTANTS,
'KRISHNA NIDHI', NEAR NATRAJ GARDEN,
KHAMGAON 444 303
CONTACT NO.:7722072117
E- MAIL ID: ratan_rathi@rediffmail.com

**RATAN RATHI & COMPANY**
**CHARTERED ACCOUNTANTS**

"KrishanaNidhi",Near Natraj Garden,
Khamgaon (Dist Buldhana) - 444303
Ph: 7722072117, 9422180005

Date:02-01-2025

## ACCOUNTANTS REPORT ON COMPILATION OF UNAUDITED FINANCIAL STATEMENTS

To,
The Hon, Administrative Officer
MSCPCR
Worli, Mumbai

On the basis of the accounting records and other information and explanation provided to us by the management, we have complied the unaudited balance sheet of MSCPCR Worli, Mumbai as on March 31, 2020 and the related Income & Expenditure Account and Receipts & Payments Accounts for the period then ended.

The management of the Administrator Worli, Mumbai- MSCPCR is responsible for

A. Completeness and accuracy of the underlying data and complete disclosure of all material and relevant information to the accountant.

B. Maintaining adequate accounting and other records and internal and selecting and applying appropriate accounting policies.

C. Preparation and presentation of financial statements in accordance with applicable laws and regulations, if any.

D. Establishing controls to safeguard the Assets of entity and preventing and detecting frauds or other irregularities.

E. Establishing controls for ensuring that the activities of the entity are carried out in accordance with applicable laws and regulations and preventing and detecting any non-compliance.

The compilation engagement was carried out by us in accordance with standard on Related Services (SRS) 4410" Engagement to compile Financial Information" issued by the Institute of Chartered Accountants of India.

The Balance sheet and Income & Expenditure Account are in agreement with the books of accounts subject to our notes and remarks. We have not audited or reviewed these financial statements and accordingly we do not express an opinion thereon.

For Ratan Rathi& Co
Chartered Accountants

RATAN RATHI & CO. Chartered Accountants F.R.No.105693W Near Natraj Garden, Khamgaon

CA Ratan Rathi
Partner
Membership No.: 036429

MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS,MUMBAI
3RD FLOOR , TRANSPORT SERVICE S.P ROAD WORLI, MUMBAI
INCOME AND EXPENDITURE ACCOUNTS FOR THE YEAR ENDED 31st M/9,203,200 )20

| Expenditure | SALARY | NON SALARY | OTHERS | INCOME | SALARY | NON SALARY | OTHERS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Salary & Allowances | 13,885,239 | | | **Grant Received** | | | |
| Bank Charges | | 416 | | Salary & Allowance | 9,203,200 | | |
| Printing and Stationery | | 203,582 | | Grant Received on Non-Salary | | 489,000 | |
| Tour & Travelling Expenses | | 706,607 | | Jijau Mission | | 7655 | |
| Allowance to Secretary | | 88,000 | | | | | |
| Electricity Expenses | | 160,610 | | | | | |
| Internet Charges | | 57,310 | | **Other Income** | | | |
| GST TDS Expense | | 5,580 | | Bank Interest | | 25,162 | |
| Office Expenses | | 113,716 | | Sales of Scrap | | | 2540 |
| Meeting Allowance | | 65,242 | | Honorarium | 20000 | | |
| News Paper Expenses | | 8,870 | | | | | |
| Postage Expense | | 29,941 | | | | | |
| Repairs & Maintenance Non Salary | | 75,533 | | Excess of Expenditure Over Income | | | |
| Sale of Scrap Deposited | | | 2,540 | | | | |
| Convention UNICEF | | | 6153 | | | | |
| Depreciation | 829 | 191,300 | | | | | |
| **Excess income over Expenditure** | (4,662,868) | (1,184,889) | (6,153) | | | | |
| | 9,223,200 | 521,817 | 2,540 | | 9,223,200 | 521,817 | 2,540 |

BOOKS OF ACCOUNTS HAS BEEN COMPLIED BY US ON THE BASIS OF DATA PRODUCED BEFORE US AND We have not audited or reviewed these financial statements and accordingly we do not express an opinion thereon.

For Ratan Rathi & Co.
Chartered Accountant

CA Ratan K. Rathi
Partner
M. No. 036429
UDIN : 25036429BMINKY5400

RATAN RATHI & CO. Chartered Accountants F.R.No.108598W

Place: Khamgaon
Date: 02/01/2025

# MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS,MUMBAI
## 3RD FLOOR , TRANSPORT SERVICE S.P ROAD WORLI, MUMBAI
## INCOME AND EXPENDITURE ACCOUNTS FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2020

| Expenditure | SALARY | NON SALARY | OTHERS | INCOME | SALARY | NON SALARY | OTHERS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Salary & Allowances | 13,885,239 | | | <u>Grant Received</u> | | | |
| Bank Charges | | 416 | | Salary & Allowance | 9,203,200 | | |
| Printing and Stationery | | 203,582 | | Grant Received on Non-Salary | | 489,000 | |
| Tour & Travelling Expenses | | 706,607 | | Jijau Mission | | 7655 | |
| Allowance to Secretary | | 88,000 | | | | | |
| Electricity Expenses | | 160,610 | | | | | |
| Internet Charges | | 57,310 | | <u>Other Income</u> | | | |
| GST TDS Expense | | 5,580 | | Bank Interest | | 25,162 | |
| Office Expenses | | 113,716 | | Sales of Scrap | | | 2540 |
| Meeting Allowance | | 65,242 | | Honorarium | 20000 | | |
| News Paper Expenses | | 8,870 | | | | | |
| Postage Expense | | 29,941 | | | | | |
| Repairs & Maintenance Non Salary | | 75,533 | | Excess of Expenditure Over Income | | | |
| Sale of Scrap Deposited | | | 2,540 | | | | |
| Convention UNICEF | | | 6153 | | | | |
| Depreciation | 829 | 191,300 | | | | | |
| **Excess income over Expenditure** | (4,662,868) | (1,184,889) | (6,153) | | | | |
| | 9,223,200 | 521,817 | 2,540 | | 9,223,200 | 521,817 | 2,540 |

BOOKS OF ACCOUNTS HAS BEEN COMPLIED BY US ON THE BASIS OF DATA PRODUCED BEFORE US AND We have not audited or reviewed these financial statements and accordingly we do not express an opinion thereon.

For Ratan Rathi & Co.
Chartered Accountant

CA Ratan K. Rathi
Partner
M. No. 036429
UDIN : 25036429BMINKY5400

Place: Khamgaon
Date: 02/01/2025

MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS,MUMBAI
3RD FLOOR , TRANSPORT SERVICE S.P ROAD WORLI, MUMBAI
RECEIPT AND PAYMENT ACCOUNTS FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2020

| RECEIPTS | SALARY | NON SALARY | OTHERS | PAYMENT | SALARY | NON SALARY | OTHERS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Opening Balance:** | | | | Salary & Allowances | 6,292,110 | 273,091 | |
| State Bank of India | 20050 | 387,682 | | Bank Charges | | 416 | |
| RBI PLA( Salary A/C Book) | 1,780,303 | 815169 | | Printing & Stationary | | 184,162 | |
| Cash in Hand(Non Salary Petty Cash Book) | 0 | 15,475 | | Tour & Travelling Expenses SBI | | 83,240 | |
| Cheque in Hand | | 10 | | Meeting Allowance | | 65,242 | |
| | 1,800,353 | 1,218,336 | - | Advertisement | | - | |
| | | | | Allowance to Secretary | | 88,000 | |
| | | | | Cosmos Agencies | | 156,710 | |
| | | | | Chief Minister Relief Fund - Non Salary | 5,555 | | |
| **Grant Received:** | | | | Dr Vivek Joshi | | 18,993 | |
| Salary & Allowances | 9,203,200 | - | - | Office Expenses | | 113,716 | |
| Non-Salary | - | 489,000 | - | Petrol Expenses | | - | |
| UNICEF | - | - | - | Electricity Expenses | | 160,610 | |
| Jijau Mission | - | 7,655 | - | Language Translation Charges | | - | |
| | 9,203,200 | 496,655 | - | Newspaper Expense | | 8,870 | |
| | | | | Postage Expenses | | 29,941 | |
| | | | | EPBX - Non Salary | | 47,991 | |
| | | | | TDS Payable - Salary | | 15,491 | |
| **Other Receipts** | | | | RTE Expenses | | - | |
| Bank Interest | | 25,162 | | Internet Charges | | 57,310 | |
| Sale of Scrap | | 2540 | | Repairs & Maintenance | | 23,552 | |
| Honorarium | 20,000 | | - | GST TDS Expense | | 5,580 | |
| | | | | Sitting & Other Allowance | | - | |
| | | | | Tour & Travelling Expenses (Petty Cash) | | 60,125 | |
| | | | | Professional Tax Salary | 11,100 | - | |
| | | | | Fastrack Infotech | | 68,100 | |
| By Tranfer (To Non Salary Petty Cash ) | | 240000 | | Festive Advances given | 6,250 | 1,250 | |
| | | | | Sale of Scrap Deposited | | 2,540 | |
| | | | | Sulbha Travels | | 33,972 | |
| | | | | Core Solution | | 50,838 | |
| | | | | Smt. Kelkar | 40,000 | | |
| | | | | Sanjay Travels | - | 360,171 | |
| | | | | Grant Refunded | | - | |
| | | | | RTI Fees | | - | |
| | | | | GPF Payable - Salary | 704,351 | | |
| | | | | GPF Payable (Class IV) - Salary | 55,000 | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | GIS Payable - Salary | 24,240 | | |
| | | | | HBA Payable - Salary | 510,210 | | |
| | | | | HRR Payable - Salary | 1,725 | | |
| | | | | DCPS (NPS) Payable - Salary | 255,190 | | |
| | | | | Income Tax Payable - Salary | 1,146,598 | | |
| | | | | By Tranfer (To Non Salary Petty Cash ) | | 240,000 | |
| | | | | Insurance Payable - Salary | 2,478 | | |
| | | | | Audit Fees | | - | |
| | | | | Convention UNICEF | | 6,153 | |
| | | | | Closing Balance | | | |
| | | | | Cash in hand | | 10 | |
| | | | | Non Salary Petty Cash Book | | 28,578 | |
| | | | | State bank of India | 1,948,746 | (204,499) | |
| | | | | RBI PLA | - | - | |
| **Total** | **11,003,553** | **1,980,153** | - | **Total** | **11,003,553** | **1,980,153** | - |

**BOOKS OF ACCOUNTS HAS BEEN COMPLIED BY US ON THE BASIS OF DATA PRODUCED BEFORE US AND We have not audited or reviewed these financial statements and accordingly we do not express an opinion thereon.**

For Ratan Rathi & Co.
Chartered Accountant

CA Ratan K. Rathi
Partner
M. No. 036429
UDIN : 25036429BMINKY5400

Place: Khamgaon
Date: 02/01/2025

| BLOCKS OF ASSETS | RATE OF DEPRECIATION | WDV AS ON 01.4.2019 | Addition upto 180days | Addition after 180 days | Sale/Scrap/Deletion During The Year | Sub Total | Depriciation | WDV AS ON 31-03-2020 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (a) | (b) | © | (d) | (a+b+c+d)=(e) | (f) | (e+f)=g |
| Building | | | | | | | | |
| PWD & Civil | 10% | 504558.00 | 0 | 0 | 0 | 504558.00 | 50455.80 | 454102.20 |
| Computers & Accessories | | | | | | | | |
| Computers | 40% | 13056.00 | 0 | 69632 | 0 | 82688.00 | 19148.80 | 63539.20 |
| Printer | 40% | 19188.00 | 0 | 0 | 0 | 19188.00 | 7675.20 | 11512.80 |
| Equipment | | | | | | | | |
| Digital Cameras | 15% | 5568.35 | 0 | 0 | 0 | 5568.35 | 835.25 | 4733.10 |
| EPBX | 15% | 23468.50 | 47991 | 0 | 0 | 71459.50 | 10718.93 | 60740.58 |
| LED TV | 15% | 19124.15 | 0 | 0 | 0 | 19124.15 | 2868.62 | 16255.53 |
| Projector | 15% | 16416.90 | 0 | 0 | 0 | 16416.90 | 2462.54 | 13954.37 |
| Water Cooler & Purifier | 15% | 8476.20 | 0 | 0 | 0 | 8476.20 | 1271.43 | 7204.77 |
| Xerox Machine | 15% | 26912.70 | 0 | 0 | 0 | 26912.70 | 4036.91 | 22875.80 |
| Biomatrix System | 15% | 5526.70 | 0 | 0 | 0 | 5526.70 | 829.01 | 4697.70 |
| Furniture & Fixtures | 10% | 918261.00 | 0 | 0 | 0 | 918261.00 | 91826.10 | 826434.90 |
| Total | | 1560556.50 | 47991 | 69632 | 0 | 1678179.50 | 192128.58 | 1486050.93 |

स्वप्न बलशाली राष्ट्राचे बालमतांच्या सन्मानाचे

# बाल हक्क संरक्षण आयोग
## महाराष्ट्र राज्य

तिसरा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत,

सर पोचखानवाला रोड, वरळी,

मुंबई, महाराष्ट्र.

दूरध्वनी क्रमांक 022-24920894 / 95/97

फॅक्स नं .022- 24920896

ई-मेलः mscpcr@gmail.com

वेबसाईट :mscpcr.egov.co.in